# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**मंगळवार, दिनांक १८ जून, २०१९ / ज्येष्ठ २८, १९४१ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) महसूल, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**<br>**(२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**<br>**(३) फलोत्पादन मंत्री**<br>**(४) कृषी मंत्री**<br>**(५) मदत व पुनर्वसन मंत्री**<br>**(६) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७४**

---

### बीड जिल्हयात अवैधरित्या शस्त्रक्रिया करुन महिलांची गर्भपिशवी काढणाऱ्या रुग्णालयांविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(१) * ४६५०० डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिकेत तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.विनायकराव मेटे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयात गत ३ वर्षात १०१ रुग्णालयांमध्ये ४ हजार ६०५ महिलांच्या गर्भपिशवी अवैधरित्या शस्त्रक्रिया करुन काढून टाकण्याची बाब माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्ह्यातील ग्रामीण व शहरातील भूमिहीन व अल्पभुधारक शेतकरी ऊसतोड महिलांच्या आरोग्याबाबत सामाजिक संस्थांनी तपासणी केली असता २० ते ४० वयोगटातील ४२ टक्के महिलांची गर्भपिशवी खाजगी रुग्णालयातून शस्त्रक्रिया करुन काढण्यात आल्याचे निदर्शनास आले, सदर खाजगी डॉक्टर महिलांना पोटात दुखणे, सॅनिटरी पॅड न वापरणे, गर्भाशयावर सुज येणे, गाठ असणे किंवा कॅन्सर होण्याची भिती दाखवून गर्भपिशवीची शस्त्रक्रिया करुन रुग्णांची आर्थिक लूट करीत आहेत, तसेच गर्भवती महिलांची नैसर्गिक प्रसुती न करता शस्त्रक्रिया करुन प्रसूती करुन रुग्णांकडून आर्थिक लूट करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शस्त्रक्रिया करुन गर्भपिशवी काढून टाकणाऱ्या तसेच, गर्भवती महिलांची नैसर्गिक प्रसुती न करता शस्त्रक्रिया करुन प्रसूती करणाऱ्या डॉक्टर व शासकीय जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा रुग्णालयांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक यांनी गठित केलेल्या समितीने तसेच ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय येथील वैद्यकीय अधीक्षक यांनी बीड जिल्ह्यातील ९९ खाजगी रुग्णालयाची तपासणी केली असता ३ वर्षात (सन २०१६-१७, २०१७-१८ व २०१८-१९) ४६०५ एवढ्या गर्भपिशवी काढण्याच्या शस्त्रक्रिया झाल्या आहेत. सदर जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयात शस्त्रक्रिया प्रसुतीचे प्रमाण नैसर्गिक प्रसुतीच्यापेक्षा कमी असल्याचे दिसून येते.

(३) जिल्हाधिकारी, बीड यांनी त्यांचे दिनांक १६/०४/२०१९ च्या पत्रान्वये गर्भपिशवी काढण्यापूर्वी संबंधित सर्व खाजगी रुग्णालयांनी जिल्हा शल्य चिकित्सक वा वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय वा उपजिल्हा रुग्णालय यांची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक केले आहे. सर्व रुग्णालयांना दर्शनी भागात गर्भपिशवी काढण्याअगोदर माहिती तसेच सदर पिशवी व स्त्रीबीजकोष काढल्यानंतर होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती दर्शनी भागात लावणे

बंधनकारक केले आहे. AMOGS व FOGSI संघटने मार्फत राज्यातील सर्व स्त्रीरोग तज्ञांना गर्भपिशव्या काढून टाकण्याच्या अनावश्यक शस्त्रक्रिया करु नयेत अशा सूचना दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात दुष्काळग्रस्तांना मदत देण्याबाबत

**(२) * ४६५१७ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, अॅड.हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.सुभाष झांबड, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नरेंद्र दराडे, श्री.जयंत पाटील, श्री.विप्लव बाजोरिया, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात २८५२३ गावांमध्ये भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली असून ८२ लाख शेतकरी दुष्काळाने बाधित झाले असून ३४४ तालुक्यांपैकी १५१ तालुक्यांमध्ये शासनाने दुष्काळ जाहीर केला असून त्यापैकी ५० लाख शेतकऱ्यांना दुष्काळी मदत जाहीर करुनही दुष्काळी अनुदानाचे रुपये ६५२२ कोटी शासनाकडून मिळाले नाही तसेच माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान धरणांतील साठा २५ टक्क्यापर्यंत खाली आला आहे व सहा लाखांपेक्षा जास्त जनावरांच्या चाऱ्यांचा प्रश्न निर्माण झाला असून दुष्काळी परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१८-१९ या वर्षात पडलेल्या दुष्काळामुळे राज्यात मराठवाड्यासह बीड, जालना, सोलापूर, नाशिक, अहमदनगर, यवतमाळ, औरंगाबाद, हिंगोली, परभणी, उस्मानाबाद जिल्ह्यांमध्ये उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाल्याने अनेक कुटुंबे रोजगाराच्या शोधासाठी स्थलांतर होत असून राज्यातील औरंगाबाद, उस्मानाबाद, बीड व जालना या जिल्ह्यातील ग्रामस्थांनी मनरेगा योजनेंतर्गत काम मिळावे अशी मागणी करण्यात येऊनही याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालम (जि.परभणी) तालुक्यात यावर्षी कमी पाऊसामुळे तालुक्यातील गोदावरी नदीच्या पट्ट्यातील आरखेड, सोमेश्वर व उमरथडीच्या शिवारात इतर पिकांबरोबरच कांदा पिकाच्या उत्पादनात घट झाली असून शेतकरी आर्थिक अडचणीत आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दुष्काळी उपाययोजना लागू करुन दुष्काळग्रस्तांना मदत देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे किती निधीची मागणी केली आहे, त्यापैकी किती निधी राज्य शासनाला मिळाला आहे व किती निधी प्रलंबित आहे, तसेच केंद्र व राज्य शासनाकडून निधीची तरतूद करुन दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना अनुदान देण्यासह राज्यात जिल्हानिहाय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) अंशतः खरे आहे.

महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील १५१ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या १५१ तालुक्यांसाठी रुपये ४९०९.५१ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला होता. त्यापैकी ६६.८८ लक्ष इतक्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर रुपये ४४६१.२० कोटी इतका निधी वर्ग करण्यात आला आहे. तसेच दुष्काळ जाहीर केलेल्या तालुक्यात खालील उपाययोजना जाहीर करून दिनांक २५ जानेवारी, २०१९ च्या शासन निर्णयान्वये जनावरांसाठी चारा छावणी सुरू करण्यात आल्या आहेत.

१) जमीन महसूलात सूट.
२) सहकारी कर्जाचे पुनर्गठन.
३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती.
४) कृषी पंपाच्या चालू वीज बिलात ३३.५% सूट.
५) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी.
६) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता.
७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर.

८) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.

(२) हे खरे नाही.

मनरेगा ही मागणी आधारीत योजना असून ग्रामसभेमध्ये गावनिहाय मनरेगाची कामे घेण्याबाबत आराखडा तयार करण्यात येतो व मजुरांना काम उपलब्ध करून देण्यासाठी कामाचा शेल्फ ठेवण्यात येतो. या योजनेंतर्गत मागणी आधारे सार्वजनिक व वैयक्तिक स्वरूपाची कामे घेण्यात येतात. ज्या मजुरांनी कामासाठी ग्राम पंचायतीकडे नमुना क्र. ४ मध्ये कामाचा अर्ज केला आहे. त्यांना त्यांचे गावाचे हद्दीतच काम पुरविले जाते.

सन २०१८-१९ मध्ये बीड-१२९७१४, जालना-९२१७५, सोलापूर-३१०२९, नाशिक-१२००५५, अहमदनगर-११३०१५, यवतमाळ-१३१३२७, औरंगाबाद-७९४०२, हिंगोली-६६३३४, परभणी-५७४०१, उस्मानाबाद-६१२५९ इतक्या मजुरांना रोजगार देण्यात आला. या मजुरांच्या माध्यमातून एकूण १,०१,२६४ इतकी कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

तसेच ४२५.६७ कोटी इतका खर्च मजुरांच्या मजूरीवर करण्यात आलेला आहे. सर्व जिल्हयांमध्ये जास्तीत जास्त मजुरांनी कामाची मागणी करावी याकरीता प्रयत्न करण्यात येत आहे. त्यामुळे मनरेगाचे काम मिळत नसल्याने अनेक कुटूंबानी स्थलांतर केलेले नाही.

(३) सन २०१८-१९ मध्ये पालम तालुक्यात कांदा या पिकाखालील क्षेत्र अंदाजे ११७ हेक्टर असून त्याचे उत्पन्न २९२५ मे. टन येणे अपेक्षित होते. परंतु कमी पावसामुळे ५० पेक्षा जास्त घट झाल्याचे दिसून येते. दुष्काळी परिस्थितीमुळे पालम तालुक्यातील ४६२९० हेक्टर वरील शेतीचे नुकसान झाल्याने बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी रूपये २२५२.६४ लक्ष निधी उपलब्ध करून देण्यात आला असून ४१२८० बाधित शेतकऱ्यांपैकी ४०७६७ शेतकऱ्यांच्या खात्यावर निधी वर्ग करण्यात आला आहे.

(४) राज्य शासनाने कृषीविषयक नुकसान, पिण्याचा पाण्याचा पुरवठा व चारा यासाठी रूपये ७९६२.६३ कोटी इतक्या रकमेचे मदतीचे ज्ञापन केंद्र शासनास पाठविले होते. त्यानुसार केंद्र शासनाने राज्य शासनास राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीमधून रूपये ४५६२.८८ कोटी इतका मदत निधी मंजूर केला आहे. या निधीपैकी राज्यास रुपये ४२४८ कोटी इतका निधी प्रत्यक्ष मिळाला आहे व रुपये ३१४ कोटी इतका निधी प्रलंबित आहे.

सन २०१९-२० वर्षाकरीता दुष्काळासाठी रूपये ४४७३ कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीचा पुनर्विकास करणेबाबत

**(३) * ४७०४४ ॲड.अनिल परब : तारांकित प्रश्न क्रमांक ४१२९७ ला दिनांक ६ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीचा पुनर्विकास करणे विचाराधीन असल्याने त्यास अनुसरून प्रकल्पाचा सुसाध्यता अहवाल शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बाह्य अर्थसहाय्याद्वारे कर्ज उभारुन अस्तित्वातील इमारतींच्या जागी बहूमजली इमारती बांधण्याचे प्रस्तावित असल्याने सुसाध्यता अहवालाची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय, तसेच कर्ज उभारणे प्रक्रिया व पुनर्विकासाचा खर्च व कालावधीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर वसाहतीमध्ये वारंवार घडत असलेल्या घटना विचारात घेऊन संरचनात्मक परिक्षणानुसार संरचनात्मक दुरुस्तीची कामे हाती घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) सदर प्रकल्पाचा सुसाध्यता अहवाल व बृहत आराखडा (Feasibility Report and Master Plan) कोरीया शासनाच्या मदतीने तयार करण्याचा करारनामा झाला असून काम प्रगतीत आहे.

(३) संरचनात्मक परिक्षणानुसार आवश्यक संरचनात्मक दुरुस्तीची कामे टप्प्या टप्प्याने निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयातील प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत

**(४) * ४७३६५ श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हयात सन २००६ ते २०१३ या कालावधीत विविध प्रकल्पासाठी शासनाने शेतकऱ्यांच्या शेतजमिनी कमी दरात खरेदी करुन अत्यल्प मोबदला दिला असल्याची तक्रार विदर्भ बळीराजा कृती समितीने जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे केली असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कृती समितीने वेळोवेळी आंदोलने, निवेदने दिले असून त्यांना केवळ आश्वासने देण्यात आले असल्याने धरणग्रस्थांना योग्य न्याय मिळेपर्यंत सर्व प्रकारची कामे बंद करावी, सन २००० ते डिसेंबर, २०१३ या कालावधीत अल्पदरात सरळ खरेदीदारक शेतकऱ्यांना २०१३ च्या कायद्यातील तरतुदी प्रमाणे, वाढीव मोबदला मिळावा, प्रकल्प विस्थापितांचे पुनर्वसन महाराष्ट्र शासन पुनर्वसन कायदा २०१३ नुसार करावे, पुनर्वसित गावांना पंतप्रधान आवास योजनेंतर्गत लाभ देण्यात यावा, पुनर्वसित कुटुंबांना अंत्योदय योजनेंतर्गत प्रति कुटुंब ५० किलो धान्य इत्यादी मागण्या कृती समितीने केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्पग्रस्त/ धरणग्रस्तांच्या मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) सन २००० व डिसेंबर, २०१३ या कालावधीत एकूण १३६७.६७ हे.आर. इतकी जमीन सरळ खरेदीव्दारे संबंधित यंत्रणेने ताब्यात घेतलेली आहे. याकरीता रुपये ८१.४५ कोटी संबंधित भूधारकास अदा करण्यात आला आहे.

सदर खरेदी व्यवहार हे संबंधित यंत्रणास्तरावरुन महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक, दिनांक ६/०६/२००६ च्या प्रमाणे भूधारकांसमवेत तडजोडीव्दारे व त्यांचे सहमतीने करण्यात आलेले असल्यामुळे त्यांना भूसंपादन अधिनियम, २०१३ नुसार वाढीव मोबदला व इतर लाभ देय ठरत नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात शेतकरी आत्महत्या रोखण्याबाबत

**(५) * ४७६४१ श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शासनाकडून शेतकरी स्वावलंबी मिशन व सन्मान योजना राबविण्यात आली असूनही गेल्या ४ वर्षात शेतीमालाला हमीभाव नाही, बोंडअळी प्रादुर्भावामुळे बाधित शेतकरी वर्ग, कर्जबाजारीपणा व दुष्काळामुळे १२ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असल्याचे दिनांक १४ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यातील औरंगाबाद, जालना, उस्मानाबाद, बीड, हिंगोली, लातूर, परभणी व नांदेड या जिल्ह्यात ४,१२४ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत, त्यापैकी नांदेड जिल्ह्यात माहे डिसेंबर, २०१८ च्या पहिल्या आठवड्यापर्यंत ९४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून केवळ ३४

आत्महत्याग्रस्त कुटुंबियांना शासनाकडून मदत मिळाली असून ८ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित ठेवण्यात आली आहेत, त्यामुळे शासनाकडून नुकसान भरपाई संदर्भात येणारे अनेक प्रस्ताव फेटाळले जात असल्याने निम्मे कुटुंबीय मदतीपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्जमाफी व दुष्काळी उपाययोजना व नोकरभरतीबाबत मा.मुख्यमंत्री यांनी आश्वासन देऊनही याबाबत सक्षम कार्यवाही होत नसल्याने राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यात वाढ होत असल्याचे माहिती अधिकारात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याच्या निकषार्थ शिथिलता आणून बाधितांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच, शेतकरी आत्महत्या रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) राज्यात सन २०१५ ते सन २०१८ या मागील चार वर्षामध्ये १२०२१ शेतकरी आत्महत्यांची प्रकरणे निदर्शनास आली असून या आत्महत्यांपैकी ६८८८ प्रकरणे जिल्हास्तरीय समितीमध्ये पात्र असून ४४१० प्रकरणे अपात्र ठरलेली आहेत. पात्र प्रकरणांपैकी ६८४५ प्रकरणी आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांच्या वारसांना रुपये १.०० लक्ष ची मदत देण्यात आली आहे.

(२) औरंगाबाद विभागात सन २०१५ ते २०१८ या चार वर्षात एकूण ४१२४ शेतकरी आत्महत्यांची प्रकरणे निदर्शनास आली असून नांदेड जिल्ह्यात सन २०१८ च्या पहिल्या आठवड्यात एकूण ९४ शेतकरी आत्महत्यांची प्रकरणे निदर्शनास आली आहेत. त्यापैकी ५८ प्रकरणे जिल्हास्तरीय समितीमध्ये मदतीसाठी पात्र व ३६ प्रकरणे मदतीसाठी अपात्र ठरविण्यात आलेली आहेत.

(३) व (४) दिनांक २७ फेब्रुवारी, २००६ च्या शासन निर्णयानुसार मृत शेतकऱ्यांच्या वारसांना मदत देण्याबाबत चौकशी करतेवेळी सदर व्यक्ती शेतकरी होता किंवा कसे याबाबत निकष सुधारण्यात आले असून मृत व्यक्तीच्या कुटुंबातील कोणतीही व्यक्ती शेतजमीन धारण करीत असेल तर

सदर व्यक्तीस शेतकरी म्हणून गृहीत धरण्यात येते, मृत शेतकऱ्यांच्या वारसांना मदत देण्याबाबत चौकशी करताना सदर व्यक्तीने शेतीसाठी, शेती सुधारण्यासाठी कर्ज घेतले होते किंवा कसे याबाबत निकष सुधारण्यात येत असून मृत व्यक्तीच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीने राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, सहकारी पतसंस्था व मान्यता प्राप्त सावकार यांचेकडून कर्ज घेतले असल्यास व सदर कर्जाची परतफेड न करता आल्यामुळे कर्जाचे हप्ते प्रलंबित असल्यास सदर व्यक्तीस मदतीसाठी पात्र ठरविण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद ते पैठण राज्य मार्गाचे चौपदरीकरण करण्याबाबत

**(६) * ४६६९३ श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.बाळाराम पाटील, श्री.दत्तात्रय सावंत : तारांकित प्रश्न क्रमांक ४४७६५ ला दिनांक १९ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या भारतमाला प्रकल्पांतर्गत औरंगाबाद ते पैठण या रस्त्याच्या डि.पी.आर. बनविण्याचे काम सुरु असून अस्तित्वातील रस्ता तसेच पर्यायी बाहयवळण रस्ता यांचा अभ्यास तांत्रिक सल्लागार मे.इजिस इंडिया कंपनी मार्फत करण्यात येणारे काम पूर्ण झाले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने औरंगाबाद ते पैठण राज्य मार्गाचे चौपदरीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
सदर काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आले असून या रस्त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्याचे काम तांत्रिक सल्लागार मे.इजिस इंडिया या कंपनीकडून प्रगतीपथावर आहे.

तथापि, त्यानुसार प्राथमिक तांत्रिक बाबींच्या अभ्यासाअंती अस्तित्वातील औरंगाबाद ते पैठण चौपदरीकरणाचे काम व्यवहार्य (Feasible) नसल्याकारणाने नविन स्वतंत्र Green Field संरेखनेला सक्षम अधिकाऱ्यांमार्फत मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे या नविन संरेखनाला पर्यायी “बाहयवळण रस्ता” म्हणणे संयुक्तीक होणार नाही, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, औरंगाबाद यांनी कळविले आहे.

(२) सदर डि.पी.आर. चा अभ्यास करताना प्रस्तावित महामार्गालगत होणारे डेव्हलपमेंट तसेच औरंगाबाद शहर यांचा संयुक्तीक विचार करुन त्याप्रमाणे या रा.म.क्र. ७५२ ई ची आखणी करण्यात येत आहे. तसेच केंद्र शासनाने सदर रस्त्याचा मध्यम प्राधान्यक्रमात अंतर्भाव केला असून त्यानुषंगाने प्रस्तावित कामाकरीता आवश्यक असलेल्या भूसंपादनाची कार्यवाही हाती घेण्यात आली आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,औरंगाबाद यांनी कळविले आहे.

(३) केंद्र शासनाच्या प्राधान्यक्रमानुसार भूसंपादनाची कार्यवाही हाती घेण्यात आली असल्यामुळे विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डागा स्मृती रुग्णालय, नागपूर येथे सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(७) * ४७५३० श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील डागा स्मृती रुग्णालयात गर्भवती महिला आणि नवजात बालकांकरीता असलेले प्रसुती वार्ड कबाड खोलीत असल्याचे दिनांक ४/०३/२०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून सदर कबाड खोलीत धुळ व अस्वच्छतेमुळे गेल्या ३ वर्षात २१६ शिशु बालकांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डागा रुग्णालय, नागपूर येथे व्हेंटिलेटर, अतिदक्षता विभाग व एम.डी. मेडिसीन फिजिशियन नसल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रुग्णालयात व्हेटिलेटर, अतिदक्षता विभाग, स्वच्छ वार्ड व अद्यावत सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

सदर रुग्णालयात संबंधित विभागात व्हेंटीलेटर व अतिदक्षता विभाग उपलब्ध आहे. तेथे नियमित फिजिशीयन नसल्यामुळे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत प्रशिक्षित डॉक्टरामार्फत वैदयकीय सुविधा दिल्या जातात. फिजिशीयनचे पद भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील भरती प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(८) * ४६८७९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी येथील मराठवाडा कृषी विद्यापीठातील प्रकल्पग्रस्तांच्या विशेष भरती मोहिमेत पात्र व्यक्तींना डावलणे, मागासवर्गीय प्रवर्गाच्या जागा भरण्यात न येणे, प्रकल्पग्रस्त व्यक्तींच्या कुटूंबातील व्यक्तींना नोकर भरतीत समाविष्ट न करणे व इतर गैरप्रकारे भरती प्रक्रिया केल्याच्या तक्रारीवरुन मा.कृषी मंत्री यांनी सन २०१८ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी, परभणी यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, परभणी यांनी संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन त्याचा अहवाल शासनास सादर केला आहे काय, अहवालात काय नमूद करण्यात आले आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरप्रकारे भरती करणाऱ्यावर कारवाई करुन भरती प्रक्रियेत वंचित राहिलेल्या प्रकल्पग्रस्तांना सेवेत समाविष्ट करुन घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल बोंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

प्रस्तुत अहवालामध्ये भरती प्रक्रिये संदर्भातील त्रुटी नमुद करण्यात आल्या असून मा.उच्च न्यायालयात भरती प्रक्रिये संदर्भात दाखल झालेल्या याचिकेतील निर्णयाच्या अधिन राहुन सदर अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे.

(३) प्रस्तुत भरती प्रक्रिये संदर्भात मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र. १४६२/२०१८ व इतर दाखल झाल्या असून सद्य:स्थितीत सर्व याचिका न्यायप्रविष्ट आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## ठाणे विभागीय कृषी-उद्योग विकास महामंडळाचे थकित देयक अदा करण्याबाबत

**(९) * ४७९७१ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी-उद्योग विकास महामंडळाच्या ठाणे विभागीय कार्यालयाने ठाणे, पालघर आणि रायगड या जिल्ह्यातील शासनाच्या कृषी विभागास सन २००८ पासून खते, किटकनाशके, अवजारांचा पुरवठा केला असून त्याबाबतचे रूपये ३ कोटी कृषी विभागाने अदा केले नसल्याने महामंडळ आर्थिक अडचणीत आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कृषी-उद्योग विकास महामंडळाची थकित रक्कम अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल बोंडे :** (१) कृषी विभागाच्या ठाणे, पालघर, रायगड या जिल्ह्यातील कार्यालयांना महामंडळाने विविध निविष्ठांचा पुरवठा केलेला आहे, सदर निविष्ठांची रक्कम पूर्णपणे महामंडळास अदा केलेली नाही, हे खरे आहे.

(२) विविध योजनेमध्ये प्रलंबित असलेल्या रकमेबाबत विभागीयस्तरावरुन सतत पाठपुरावा करुन रुपये १८४.०० लाख इतकी रक्कम महामंडळास अदा करण्यात आलेली आहे. उर्वरित रुपये ११५.९० लाख इतकी देय रक्कम संबंधितांकडून वसुली करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केंद्र शासनाने जाहीर केलेल्या किडबाधित क्षेत्राच्या यादीत राज्यातील क्षेत्राचा समावेश करण्याबाबत

**(१०) * ४६४९४ श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिकेत तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिक्स्थ ग्रेन संस्थेच्या कृषी तज्ञांनी ऊस पिकावर अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव सांगली जिल्ह्यातील क्रांती सहकारी साखर कारखाना क्षेत्रातील घोगाव येथे सर्वप्रथम निदर्शनास आणून दिले व भारतातील पहिले निरीक्षण नोंदविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने जाहीर केलेल्या किडबाधित क्षेत्राच्या यादीत महाराष्ट्रातील क्षेत्राचा समावेश नाही. परंतु, संयुक्त राष्ट्राच्या अन्न आणि कृषी संस्थेकडून प्रकाशित अहवालात महाराष्ट्रामधील प्रादुर्भावाची माहिती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिक्स्थ ग्रेन संस्थेने दिलेल्या अहवालाची अंमलबजावणी करावी आणि केंद्र शासनाने तयार केलेल्या किडबाधित क्षेत्राच्या यादीत महाराष्ट्रातील किडबाधित क्षेत्राचा समावेश करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा, अशाप्रकारची मागणी विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद यांनी दिनांक २१ जानेवारी, २०१९ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल बोंडे :** (१) सिक्स्थ ग्रेन संस्थेच्या कृषी तज्ञांनी ऊस पिकावर अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव सांगली जिल्ह्यातील क्रांती सहकारी साखर कारखाना क्षेत्रातील घोगाव येथे सर्वप्रथम निदर्शनास आणून दिल्याबाबत व भारतातील पहिले निरीक्षण नोंदविल्याबाबतचा अहवाल शासनाकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या किडबाधित क्षेत्र अहवालात महाराष्ट्र राज्याचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्यात ऊस, मका व ज्वारी या पीकांवर मक्यावरील नवीन लष्करी अळीचा प्रादुर्भाव आढळून आला आहे.

(३) सदरचे पत्र कृषी विभागास प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(४) सन २०१८-१९ मध्ये मक्यावरील नवीन लष्करी अळीचा प्रादुर्भाव वाढू नये म्हणून ५०००० घडीपत्रिकांचे वितरण करण्यात आले आहे. वृत्तपत्रे व शेतकरी मासिक, बॅनर इत्यादींमार्फत प्रसिध्दी देण्यात आलेली आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये नियंत्रणासाठी ७६ किलो इमामेक्टीन बेन्झोयेट या किटकनाशकाचा शेतकऱ्यांना अनुदानावर पुरवठा करण्यात आला आहे. क्रॉपसॅप प्रकल्पामध्ये खरीप २०१९ पासून अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी मका, ज्वारी व ऊस सर्वेक्षणासाठी समावेश करण्यात आला आहे. कृषी विभागाचे अधिकारी/कर्मचारी यांचेव्दारे नियमित सर्वेक्षण करण्यात येत आहे. राज्यात शेतकऱ्यांना १२००० शेतकरी शेतीशाळांचे नियोजन करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(११) * ४६५२४ श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष पद गेल्या ४ वर्षांपासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त पदांमुळे मच्छीमारांच्या कल्याणाचा तसेच त्यांच्या उपजिविकेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) होय, हे खरे आहे. महामंडळाच्या संचालक मंडळावरील अध्यक्ष पदाचा अतिरिक्त कार्यभार मा.मंत्री (पदुम) यांच्याकडे आहे व उपाध्यक्ष हे पद रिक्त आहे.

(२) महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या मच्छिमारांच्या विविध योजना सुरु असल्याने मच्छिमारांच्या उपजिविकेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे हे खरे नाही.

(३) महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोवेली (ता.कल्याण, जि.ठाणे) रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१२) * ४६७१६ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवेली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय असून, सदर रुग्णालयांतर्गत ६५ गावे येत असूनही वैद्यकीय अधीक्षक, डॉक्टर व कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या/रिक्त पदे तसेच सोयीसुविधा नसल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रुग्णालयाच्या आवारात साफसफाई होत नसल्याने बाथरूम, शौचालयात घाणीचे साम्राज्य असून उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत तसेच रुग्णालय स्वच्छ ठेवून अद्ययावत सोयीसुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही,

गोवेली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित आहे. सदर रुग्णालयामधील संवर्गनिहाय मंजूर, भरलेल्या व रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदांचा तपशिल | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधीक्षक, गट-अ | ०१ | ० | ०१ |
| २. | वैद्यकीय अधिकारी, गट-अ | ०३ | ०२ | ०१ |
| ३. | नेत्र चिकित्सा अधिकारी, वर्ग-३ | ०१ | ०१ | ० |
| ४. | गट-क | १५ | १४ | ०१ |
| ५. | गट-ड | ०७ | ०४ | ०३ |
| | एकूण | २७ | २१ | ०६ |

ग्रामीण रुग्णालय गोवेली येथे आंतररुग्ण कक्ष, प्रयोगशाळा कक्ष, क्ष-किरणकक्ष, प्रसुतीकक्ष, औषधवाटप कक्ष, आयुष कक्ष, शवविच्छेदन सुविधा, रुग्णवाहीका सुविधा, लसीकरण विभाग इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत. तसेच उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत रुग्णांना वैद्यकीय सुविधा पुरविण्यात येतात. त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत नाही.

(२) हे खरे नाही,

रुग्णालयाचा आवाराची गट-ड कर्मचाऱ्यांमार्फत तसेच रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांमार्फत नियमित साफसफाई केली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही

तथापि, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील रिक्त पदे सरळ सेवेने तसेच पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच गट-ड व रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांमार्फत नियमित साफसफाई केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही,

-----------------

## उरण (जि.रायगड) तालुक्यातील जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्या भूमाफियांवर कारवाई करण्याबाबत

**(१३) * ४७६२० श्री.बाळाराम पाटील, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) तालुक्यातील खोपटा खाडी किनाऱ्यावर तसेच आजूबाजूच्या परिसरात खारफुटी भूमाफियांकडून जाळून टाकून सदर शासकीय जमिनीवर अतिक्रमण करण्याचे प्रकार सुरु असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासकीय जमिनीवर होत असलेल्या अतिक्रमणाबाबत स्थानिक ग्रामस्थांनी मागील सहा महिन्यात सातत्याने जिल्हाधिकारी, रायगड व तहसिलदार, उरण आदींकडे तक्रारी केल्या असून शासन याकडे दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासकीय जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्या भूमाफियांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

मात्र खोपटा ग्रामस्थांच्या तक्रारीचे अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, पनवेल यांचेमार्फत चौकशी करण्यात आलेली असून खाजगी जमिनीवरील कांदळवन ऱ्हास केल्याने उरण येथील दिवाणी न्यायालयात याबाबत न्यायालयीन गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खोडाळा (ता.मोखाडा, जि.पालघर) मंडळ कृषी अधिकारी कार्यालय सुरु ठेवण्याबाबत

**(१४) * ४६८२३ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील खोडाळा मंडळ कृषी अधिकारी कार्यालय सातत्याने बंद असल्याने येथील ५० हून अधिक गाव-पाड्यांतील शेतकऱ्यांच्या शेतीविषयी तक्रारी, रोजगार, विविध अनुदान योजना अशी असंख्य कामे होत नसल्यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू खोडाळा मंडळ कृषी अधिकारी कार्यालय सुरु ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल बोंडे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

खोडाळा मंडळ कृषी कार्यालयातील शिपाई श्री.एस.बी.भांगरे यांना अपघात झाल्यामुळे ते दिनांक १९/१०/२०१८ पासून वैद्यकीय रजेवर होते. त्यांच्या रजा कालावधीत मंडळ कृषी अधिकारी, खोडाळा यांनी दररोज कार्यालयातील एका कर्मचाऱ्याने कार्यालय वेळेवर उघडण्याबाबत आदेश निर्गमित करुन शेतकऱ्यांची गैरसोय टाळलेली आहे.

श्री.एस.बी.भंगारे, शिपाई, मंडळ कृषी अधिकारी, खोडाळा, ता.मोखाडा हे वैद्यकीय रजेवरुन दिनांक ०१ जानेवारी, २०१९ रोजी हजर झाले आहेत. त्यामुळे आता कार्यालय नियमितपणे कार्यालयीन वेळेत सुरु असून शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीविषयक अडीअडचणी तसेच विभागाच्या योजनेसंबंधी वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिवरा ते आनंदवाडी (ता.महागाव, जि.यवतमाळ) दरम्यान पूस नदीवरील पुलाचे संरक्षण कठडे बांधण्याबाबत

**(१५) * ४७४५८ डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिवरा ते आनंदवाडी (ता.महागाव, जि.यवतमाळ) दरम्यान पूस नदीवर असलेल्या पुलाच्या संरक्षक कठड्यांची पडझड होऊन दुरवस्था झाली असल्याने सदर ठिकाणी अपघात होऊन जिवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर पुलाची दुरुस्ती करुन संरक्षण कठडे बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे असून, सदर पुलावर दोन्ही बाजुने संरक्षक कठडे बसविण्यात आले होते. परंतु दिनांक १७/०८/२०१८ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे पुलावरुन पाणी वाहुन गेल्यामुळे दोन्ही बाजुचे १२० मीटर लांबीचे रेलींग वाहुन गेले आहेत.

(२) सदर पुलाची पाहणी करुन पुलावर संरक्षक कठडे बसविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कामगार विमा रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१६) * ४६८१३ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक ४४१०४ ला दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कामगारांना आरोग्याची सुविधा मिळावी यासाठी कार्यरत असलेल्या कामगार विमा रुग्णालयांची जबाबदारी शासन स्वीकारत नसल्याने तदनंतर राज्यस्तरीय स्वायत्त संस्था स्थापन केली असून याकरीता केंद्र शासनाकडून भरघोस निधीची अपेक्षा आहे, पंरतू १३ कामगार विमा रुग्णालयात डॉक्टर, स्पेशालिस्ट डॉक्टर व कर्मचाऱ्यांची निम्म्याहून अधिक पदे रिक्त असल्याचे दिनांक १४/०४/२०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ४५ लाख १९ हजार कामगारांची आरोग्य विमा सेवेसाठी नोंदणी करण्यात आली असून दरमहा त्यांच्या वेतनातून ठराविक रक्कम कपात केली जात आहे, परंतु विमा रुग्णालयातील रिक्त पदे आणि असुविधांमुळे कामगार खाजगी रुग्णालयातून उपचार घेत असल्याने त्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्य कामगार विमा रुग्णालयातील रिक्त पदे भरुन रुग्णालयात अद्ययावत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

राज्य कामगार विमा योजनांतर्गत ५७०२ मंजूर पदांपैकी ३०१४ पदे रिक्त आहेत. राज्य शासन व रा.का.वि.महामंडळ, नवी दिल्ली यांच्या संमतीने राज्यात विमा कामगारांना वैद्यकीय सेवा सुलभरित्या मिळणेसाठी दिनांक ११/०३/२०१९ रोजी सोसायटीची स्थापना करण्यात आलेली आहे. सोसायटीच्या कार्यकारी व नियामक मंडळाच्याकडून १२०६ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक तयार करुन रा.का.वि.महांमंडळ, नवी दिल्ली यांना सादर करण्यात आले आहे. सर्व कार्यरत कर्मचारी हे सोसायटीच्या आस्थापनेवर प्रतिनियुक्तीवर असल्याने वेतनावरील संपूर्ण खर्च रा.का.वि.महामंडळ करणार आहे. गट अ, ब, क व ड संवर्गासाठी राज्यस्तरीय निवड समिती गठीत करण्याकरीता प्रस्तावित आहे.

(२) नाही.

राज्य कामगार विमा योजनेमार्फत आंतररुग्ण सेवा व विशेषज्ञ सेवा पुरविण्यात येत असून अतिविशिष्ट सेवेसाठी वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती करण्यात येते व यावर सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात १२,१८३ रुग्णांवर २४,२३,८८,०००/- इतका खर्च झाला आहे. तसेच २०१८-१९ साली अतिविशिष्ट सेवा (super speciality) वर ESIC कडून १५०१०१ रुग्णांवर एकूण ४४,५१,७४,१६४/- इतका खर्च करण्यात आला आहे.

(३) वैद्यकीय अधिकारी गट-अ व गट-ड ची रिक्त पदे भरण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील प्रादेशिक मनोरुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१७) * ४७५४६ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.निलय नाईक, श्री.रामदास आंबटकर : तारांकित प्रश्न क्रमांक २६९८२ ला दिनांक ९ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील प्रादेशिक मनोरुग्णालयात मनोविकृती तंज्ञाची अ संवर्गातील १३ पदे, गट-ब संवर्गातील ३ पदे, गट क २८ पदे, गट-ड ९२ पदे रिक्त असल्याचे दिनांक ६/०३/२०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर येथील प्रादेशिक मनोरुग्णालयात २ वर्षापूर्वी बसविण्यात आलेल्या ५२ सी.सी.टी.व्ही. कॅमेरेपैकी अर्धे कॅमेरे बंद स्थितीत असल्याचे दिनांक ९ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर प्रादेशिक मनोरुग्णालयातील रिक्त पदे भरण्यासह रुग्णालयात नवीन सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर येथील तीन सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बंद असल्याचे दिनांक २३/०४/२०१९ रोजी निदर्शनास आले होते. सदर सी.सी.टी.व्ही. कॅमेरे टेली केअर सर्विसेस, नागपूर यांनी दिनांक २६/०४/२०१९ रोजी दुरुस्त केले आहेत.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील मनोविकृती चिकित्सकांची २० पदे नामनिर्देशनाने भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणी पत्र पाठविण्यात आले आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून मुलाखती घेण्यात आल्या असून अद्याप शिफारशी प्राप्त झालेल्या नाहीत. तसेच मनोविकृती चिकित्सकांची पदोन्नती कोटयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

गट-क व गट-ड मधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही,

-----------------

## आंबोली (जि.सिंधुदुर्ग) प्राथमिक आरोग्य केंद्रात सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१८) * ४७१२२ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, ॲड.अनिल परब, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबोली (जि.सिंधुदुर्ग) प्राथमिक आरोग्य केंद्रात मुख्य वैद्यकिय अधिकारी ते फार्मासीस पदांसह अनेक पदे रिक्त असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून आंबोली प्राथमिक आरोग्य केंद्रात अनेक सुविधांचा अभाव तसेच मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्यांपासून अनेक महत्वाची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पदे रिक्त असल्याने रुग्णांना उपचाराकरीता सावंतवाडी, आजरा या ठिकाणी जावे लागत आहे तसेच तपासणी लॅबही बंदवस्थेत असल्याने रुग्णांना खाजगी लॅबमध्ये जावे लागत असल्याने अधिकचा आर्थिक भार सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आंबोली प्राथमिक आरोग्य केंद्रात अद्ययावत सोयी सुविधा पुरविण्याबाबत तसेच रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

वैद्यकीय अधिकाऱ्यांचे दोन्ही पदे रिक्त आहेत, तथापि जिल्हा परिषदे मार्फत कंत्राटी डॉक्टरांची नेमणूक करुन १ वैद्यकीय अधिकारी या आरोग्य केंद्रासाठी देण्यात आला आहे. उर्वरीत ११ पदे भरलेली आहे.

(२) हे खरे नाही.

रुग्णांना प्राथमिक आरोग्य केंद्रातुन सेवा पुरवली जाते. तसेच शासन नियुक्त सेवा पुरवठादारामार्फत प्रयोगशाळा तपासण्या केल्या जातात.

(३) वैद्यकीय अधिकारी यांची पदे शासनस्तरावरुन भरण्याबाबतची कार्यवाही चालु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात उन्नत शेती प्रगत शेतकरी योजनेंतर्गत चंद्रपूर कृषी विभागाच्या अखत्यारीत लाभार्थी शेतकरी वंचित राहिल्याबाबत

**(१९) * ४७१४३ श्री.रामदास आंबटकर, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उन्नत शेती प्रगत शेतकरी योजनेंतर्गत सन २०१९-२० या वर्षात राबविल्या जाणाऱ्या योजनेंतर्गत चंद्रपूर कृषी विभागाच्या अखत्यारीत लाभार्थ्यांची यादी दिनांक १९ मार्च, २०१९ रोजी जाहीर करुन लाभधारक शेतकऱ्यांना दिनांक २५ मार्च, २०१९ पर्यंत शेती औजार ५ दिवसात खरेदी करण्याची मुदत दिल्याने पात्र शेतकरी तेवढी रक्कम वेळेत उपलब्ध करु न शकल्याने सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थी शेतकरी वंचित राहिले असल्याचे दिनांक २४ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पात्र लाभार्थ्यांची यादी दिनांक १९ मार्च, २०१९ रोजी प्रसिध्द केली, मात्र त्याच आठवड्यात दिनांक २०, २१, २३ व २४ या दिवशी अनुक्रमे होळी, धुलिवंदन, शनिवार व रविवार या शासकीय सुट्ट्या असल्याने शेतकरी विवंचेत सापडल्याने अनुदान परत जाण्याची स्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल बोंडे :** (१) नाही.

सन २०१९-२० या वर्षासाठी शेतकऱ्यांकडून उन्नत शेती समृध्द शेतकरी योजनेंतर्गत अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे तिसगाव (जि.औरंगाबाद) येथील भूसंपादनात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२०) * ४७४८७ श्री.प्रसाद लाड, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील तिसगाव येथील गट क्र. २१६ मधील १३ हेक्टर ५३ आर क्षेत्रातील दीड हेक्टर जमीन शासनाने विविध कामासाठी सन २००७ मध्ये संपादित केली होती, मात्र सन २००१ ते २०१६ या कालावधीत सदरहू जमिनीच्या मालकी हक्काच्या नोंदीमध्ये फेरफार करुन हीच जमीन पुन्हा नॅशनल हायवे क्र. २११ च्या भूसंपादनात शासनाला विकण्यात आल्याचे तहसिलदारांनी केलेल्या प्राथमिक चौकशीत निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

मौजे तिसगाव, ता.जि.औरंगाबाद येथील गट नं. २१६ चे एकूण क्षेत्र १३.५३ हे.आर. असून निवाडा क्र. १२/०४ दिनांक २६/०३/२००७ अन्वये औरंगाबाद शहराबाहेरील वळण रस्ता व राज्य महामार्ग क्र. ३० वरील १) वाहतूक सुरक्षिततेसाठी, २) भांडारगृह व ३) जंक्शन सुधारणा या मधील बीआर लांबीखालील रस्त्यासाठी भूसंपादन (तिसगाव मिटमिटा) साठी १.५० हे.आर. जमीन संपादन केलेली आहे.

सदर गट नं. २१६ मधून या पूर्वी संपादन झालेले क्षेत्र वगळून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग क्र. २११ साठी एकूण १.५९५० हे.आर. संपादन क्षेत्राची मोजणी करून संपादन केलेली आहे. त्यामुळे एकदा संपादन झालेली जमीन पुन्हा संपादन करण्यात आलेली नाही. असा अभिप्राय अधीक्षक भूमीअभिलेख औरंगाबाद यांनी दिनांक ११/१२/२०१८ व दिनांक २०/१२/२०१८ रोजी उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयास दिलेला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आरोग्य सेविका व महिला परिचारिकांना किमान वेतन देण्याबाबत

**(२१) * ४७००१ श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सहा हजार आरोग्य सेविका व बाराशे परिचारिका करार पध्दतीवर कार्यरत असून त्यांना आठ तासांच्या सेवेचे रुपये सहा ते आठ हजार मासिक मानधन दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अंशकालीन महिला परिचारिकांना किमान वेतन रुपये १८ हजार देण्याची मागणी शासनाकडे केली असून सदर मागणी मान्य करण्याकरीता परिचारिकांनी मुंबईतील आझाद मैदानात माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान धरणे आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून आरोग्य सेविका व महिला परिचारिकांना किमान वेतन रुपये १८ हजार देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सद्य:स्थितीत ७७६७ आरोग्य सेविका, १२४६ अधिपरिचारिका कार्यरत आहेत. आरोग्य सेविका यांना दरमहा रुपये ८३४१/- ते रुपये १२०४०/- मानधन अदा करण्यात येते, तर अधिपरिचारिका यांना दरमहा रुपये १०८००/- ते रुपये १४२००/- एवढे मानधन अदा करण्यात येते.

(२) हे अंशत: खरे आहे.

माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये आंदोलन केले होते.

(३) राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत आरोग्य सेविका, अधिपरिचारिका यांना किमान वेतन कायदा याप्रमाणे मानधनाच्या प्रस्तावास केंद्र शासनाने मंजुरी दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोनपेठ (जि.परभणी) येथील ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित करण्याबाबत

**(२२) * ४७२८० श्री.विप्लव बाजोरिया, श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनपेठ (जि.परभणी) येथील शहरामध्ये रुपये ३ कोटी ७० लाख खर्च करुन एक वर्षापूर्वी ग्रामीण रूग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम करण्यात आले असून सदर रुग्णालयाच्या इमारतीचे उद्‌घाटन न झाल्याने नागरिकांना उपचाराअभावी वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू रुग्णालय कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालयासाठी सोनपेठ येथे मुख्य इमारत बांधून पूर्ण असून सद्य:स्थितीत तेथे संरक्षण भिंती, अधिकारी कर्मचारी निवासस्थाने इ. बांधकाम प्रगतीपथावर असल्याने इमारत ताब्यात घेण्यात आलेली नाही. दिनांक ०६/०६/२०१९ च्या शासन निर्णयान्वये, सोनपेठ (जि.परभणी) येथील प्रस्तावित ग्रामीण रुग्णालयाकरीता पदनिर्मिती करण्यात आली आहे. तसेच, यंत्रसामुग्री उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे. सोनपेठ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत सोनपेठ परिसरातील जनतेस आरोग्य सुविधा पुरविण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील शेकऱ्यांना जमिनीचा मोबदला देऊन सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२३) * ४६६७१ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर : दिनांक ७ मार्च, २०१८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४ मधील प्रश्न क्रमांक २५०७० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाभुळगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील प्रकल्पग्रस्त गावांमध्ये रस्ते, वीज, पाणी, नाल्या व इतर सोयीसुविधा पुरविण्यात आल्या नसल्याचे तसेच मौजे अंतरगाव (ता.राळेगाव) येथील शेतकऱ्यांना बेंबळा प्रकल्पाकरीता संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला दिला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्तांना शासकीय सेवेत सामावून घ्यावे तसेच बेंबळा धरण हे ठेकेदारीत गेल्यामुळे स्थानिक मासेमाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौजे अंतरगाव येथील शेत गट क्र. २९४/२ मधील शेतकऱ्याने संबंधित कागदपत्रे कार्यालयात सादर करुनही जमिनीचा मोबदला मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन यवतमाळ जिल्हयात भूसंपादन झालेल्या शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देऊन सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख** : (१) हे खरे नाही. बेंबळा प्रकल्प अंतर्गत यवतमाळ जिल्हयातील बाधित झालेल्या १६ गावांचे २० गावठाणात स्थलांतर करण्यात आले असून १७ गावठाणे जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्यात आले आहेत व उर्वरीत ३ गावठाणांची हस्तांतरण प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

मौजा अंतरगाव (ता.राळेगाव) येथील शेतकऱ्यांना मोबदला उचल करणेकरीता नोटीस बजाविण्यात आली असून उपस्थित भुधारकांना मोबदला अदा करण्यात आला आहे.
(२) प्रकल्पग्रस्तांच्या नेमणुका जाहिरात देऊन संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार व स्पर्धा परीक्षेव्दारे गुणवत्तेनुसार करण्यात येतात. बेंबळा जलाशयात खाजगी एजन्सीव्दारे १५०-२०० स्थानिक मासेमारांना रोजगार देण्यात येत आहे.
(३) उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) यांनी मौजे अंतरगाव येथील शेत गट क्र. २९४/२ मधील शेतकऱ्याला दिनांक २९/१०/२०१८ अन्वये मोबदला घेण्याकरीता उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले आहे. परंतु संबंधित भुधारक मोबदला घेण्यास हजर राहिला नाही.
(४) जमिनीचा मोबदला देण्याबाबत व पुनर्वसित गावठाणामध्ये प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर व अमरावती विभागातील नझूल जमीन फ्री होल्ड करण्याबाबत

**(२४) * ४७२१२ श्री.गोपिकिशन बाजोरीया** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर व अमरावती विभागातील नझूल जमीन फ्री होल्ड करण्याबाबत दिनांक १९ फेब्रुवारी, २०१९ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने ज्यांच्या नावाने शासकीय जमीन भाडेतत्वावर किंवा अन्य प्रकारावर देण्यात आली व त्या व्यक्तीने दुसऱ्यास पोट भाडेकरु म्हणून दिली किंवा अन्य कारणाने दिली आणि ती जमीन पोट भाडेकरुच्या वापरात आणि ताब्यात मागील ४० ते ५० वर्षापासून असेल तर हा कायदा/ठराव त्या भाडेकरुला सुध्दा लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने दिनांक १९ फेब्रुवारी, २०१९ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये मंजूर झालेल्या ठरावामध्ये दुरुस्ती करण्याबाबत अथवा शुध्दीपत्रक काढण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) दिनांक १२/०२/२०१९ रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. नझूल-२०१६/प्र.क्र.१८६(ब)/ज-८, दिनांक ०२/०३/२०१९ अन्वये नागपूर व अमरावती विभागातील लिलावाद्वारे किंवा अन्यप्रकारे भाडेपट्ट्यावर निवासी व वाणिज्यिक/औद्योगिक प्रयोजनार्थ दिलेल्या नझूल जमिनी फ्री-होल्ड (भोगवटादार वर्ग-१) करण्याबाबत तरतुदी विहित करण्यात आल्या आहेत.

शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.जमीन-२४९९/प्र.क्र.१२५/ज-८, दिनांक २३/१२/२०१५ अन्वये नागपूर व अमरावती विभागातील नझूल जमिनींच्यासंदर्भात यापूर्वी झालेले शर्तभंग (अनधिकृत हस्तांतरण / वापरात बदल किंवा इतर प्रकारचे शर्तभंग) अनर्जित रक्कम घेऊन नियमानुकूल करण्याबाबतच्या तरतुदी निर्धारित केलेल्या आहेत. शर्तभंग नियमानुकूल करण्याबाबतच्या तरतुदींच्या अनुषंगाने शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.नझूल-२०१६/प्र.क्र.१८६(अ)/ज-८, दिनांक ०२/०३/२०१९ अन्वये अनर्जित रकमेच्या दरात सुधारणा करण्यात आलेली आहे.

उक्त शासन निर्णयानुसार सर्व प्रकारचे शर्तभंग नियमानुकूल करण्याबाबतचे आदेश संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून पारित केल्यानंतरच संबंधित नझूल भूखंड फ्री-होल्ड (भोगवटादार वर्ग-१) करण्यास पात्र होतील.

नझूल जमिनीचे अनधिकृत हस्तांतरण, समुचित प्राधिकरणाची परवानगी न घेता केलेला वापरातील बदल व अन्य स्वरूपाचे शर्तभंग नियमानुकूल करण्याच्या सर्वसमावेशक तरतुदी उक्त शासन निर्णयान्वये करण्यात आलेल्या असल्याने तत्संबंधी धोरणात्मक बाब सद्य:स्थितीत शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात फलोत्पादन व औषध मंडळामार्फत अनुदानावर शेतकऱ्यांना शेडनेट देण्याबाबत

**(२५) * ४७८५४ श्री.विनायकराव मेटे, श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जोड व्यवसाय म्हणून फलोत्पादन व औषध मंडळामार्फत अनुदानावर शेडनेट देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेडनेट अनुदानातील दरपत्रक शासनाने रद्द केल्याने प्रत्येक जिल्हयातील कृषी अधिकारी हे काही कंपन्या व एजंट यांना परवडतील तसेच, स्वत:चा आर्थिक फायदा होईल याप्रमाणे शेडनेट दराचे प्रस्ताव मंजुरीकरीता पाठवित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेडनेट अनुदान वाटण्यासाठी केंद्र शासनाच्या सन २०१४ च्या मार्गदर्शक सूचना वापरत असल्याने मागील बाजारभाव व आताचे बाजारभाव यामध्ये दरवाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्या कृषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन दरवाढीबाबत धोरण निश्चित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल बोंडे :** (१) होय.

(२) नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत ऑनलाईन अर्ज भरण्याकरीता मुदतवाढ देण्याबाबत

**(२६) * ४७४०२ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत शेतकऱ्यांकडून सन २०१९-२० करीता ऑनलाईन अर्ज घेण्यात येत असून ऑनलाईन अर्ज भरण्याकरीता दिनांक २९ मार्च, २०१९ रोजीपासून संकेतस्थळ सुरु करण्यात आले असून ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत दिनांक ५ एप्रिल, २०१९ रोजी संपत आहे, उक्त योजनेला कमी मुदत असल्याने व तालुका कृषी अधिकारी कार्यालयात शेतकऱ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध नसल्याने अनेक शेतकरी ऑनलाईन अर्ज करण्यापासून वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी विभागाने स्वतःच ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा स्थानिक पातळीवर सुरु करुन योजनेस मुदतवाढ देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयदत्त क्षीरसागर :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माहूर (जि.नांदेड) येथील शासकीय रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी उपस्थित राहत नसल्याबाबत

**(२७) * ४७२५१ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहूर (जि.नांदेड) येथील शासकीय रुग्णालयाचा सर्व भार अस्थायी कंत्राटी अधिकाऱ्यांवर असल्याचे दिनांक १४/०१/२०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून येथील स्थायी वैद्यकीय अधिकारी रुग्णालयात हजर राहत नसल्याने तालुक्यातील नागरिक तसेच महिला व बालक रुग्णांना खाजगी दवाखान्यातून उपचार घ्यावा लागत असल्याने जादाचा आर्थिक भार सोसावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरहजर राहणाऱ्या स्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोकणासाठी स्वतंत्र मत्स्य विज्ञान विद्यापीठ स्थापन करण्याबाबत

**(२८) * ४६६६५ श्री.विलास पोतनीस, श्री.रविंद्र फाटक, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामदास आंबटकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.प्रसाद लाड : तारांकित प्रश्न क्रमांक ४४२२६ ला दिनांक २६ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण कृषी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या रत्नागिरी मत्स्यशास्त्र महाविद्यालयाची स्थापना सन १९८१ मध्ये करण्यात आली असून सन २००० मध्ये हे महाविद्यालय नागपूर येथील महाराष्ट्र पशु आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठाशी संलग्न करण्यासाठी शासनाने परिपत्रक काढले होते, उक्त परिपत्रकानुसार कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याने रत्नागिरीतील मत्स्यशास्त्र महाविद्यालयातून पदवी घेतलेल्या १२०० विद्यार्थ्यांची पदवी धोक्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी येथे मत्स्य विज्ञान व सागरी विज्ञान विद्यापीठ स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डॉ.मुणगेकर समितीने कोकणासाठी स्वतंत्र मत्स्य विज्ञान विद्यापीठ स्थापन करण्याबाबत सादर केलेला व शासनाच्या विचाराधीन असलेल्या अहवालावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, सदर अहवालातील शिफारसींचे स्वरूप काय आहे, उक्त अहवालाची अंमलबजावणी कधीपर्यंत होणे अपेक्षित आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोकणासाठी स्वतंत्र मत्स्य विज्ञान विद्यापीठ स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) मत्स्य विज्ञान महाविद्यालय, शिरगांव, ता.दापोली, जि.रत्नागिरी हे महाविद्यालय डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाशी संलग्नीत करणे, सदर महाविद्यालयामधून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाकडून प्रदान करण्यात आलेल्या पदव्या पूर्वलक्षी प्रभावाने विधीग्राहय करणे, मत्स्य विज्ञान विद्या शाखेतील पदव्या प्रदान करण्याचे अधिकार डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठास प्रदान करणे इत्यादी मुद्यांच्या अनुषंगाने उक्त दोन्ही अधिनियमांमध्ये आवश्यक त्या दुरुत्या करण्यासंदर्भात दिनांक ०४ जून, २०१९ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये मान्यता प्राप्त झाली असून त्यानुषंगाने अध्यादेश प्रख्यापीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२), (३) व (४) कोकण विभागासाठी स्वतंत्र मत्स्य विज्ञान विद्यापीठ स्थापन करण्याच्या अनुषंगाने डॉ.मुणगेकर समितीच्या अहवालानुसार कोकण विभागासाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करावयाचे झाल्यास, १०० एकर एवढी जागा, रुपये २१५ कोटी एवढा आवर्ती खर्च २९५ कोटी अनावर्ती खर्च असा एकूण ५०१ कोटी एवढा आर्थीक भार राज्याच्या तिजोरीवर येणार आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील मत्स्य विज्ञान महाविद्यालय आता डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाशी संलग्नीत करण्यात आले असून, या महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान करण्याचे अधिकार सुध्दा सदर विद्यापीठास देण्यात आलेले आहेत.

उक्त वस्तुस्थिती विचारात घेता तूर्त कोकणासाठी स्वतंत्र मत्स्य विज्ञान विद्यापीठ स्थापन करण्याची आवश्यकता वाटत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## हिंगोली जिल्हा रुग्णालयातील रुग्णांना सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२९) * ४७०९९ श्री.रामराव वडकुते, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हा सामान्य रुग्णालयात रुग्णांना सुविधा मिळत नसून रुग्णालयांतील रक्त पेढी विभागात कर्मचारी उपस्थित राहत नसल्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांना रक्त मिळत नसल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने हिंगोली जिल्हा रुग्णालयातील रुग्णांना सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच तेथील रुग्णांना पुरेश्या प्रमाणात रक्तपेढीतून रक्त पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

जिल्हा रुग्णालय, हिंगोली येथील एनसीडी विभागात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची बदली झाल्यामुळे एनसीडी विभागात तंत्रज्ञांची निकड लक्षात घेता रक्तपेढी विभागातील कर्मचाऱ्यास एनसीडी विभागातील काम सोपविण्यात आल्यामुळे दिनांक ०१/०२/२०१९ रोजी १ दिवसासाठी रक्तपेढी कर्मचारी उपस्थित नसल्याने रुग्णांची थोडी गैरसोय झाली होती. तरीही या दिवशी ५ रक्तदात्यांना रक्तपिशव्यांचा पुरवठा करण्यात आला. दिनांक ०२/०२/२०१९ पासून नियमितपणे कर्मचारी कार्यरत आहे. दिनांक ०२/०२/२०१९ पासून रुग्णांच्या मागणीनुसार २७७ रक्तपिशव्या रुग्णांना वितरीत करण्यात आल्या व ७० पिशव्या रक्तपेढी, परभणी व २५ रक्तपिशव्या शासकीय रक्तपेढी नांदेड यांना पाठविण्यात आल्या. दिनांक ०२/०२/२०१९ पासून रक्तपेढीचे कामकाज सुरळीत सुरु असून कोणतीही तक्रार नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कसारा-डोळखांब (ता.शहापूर, जि.ठाणे) रस्त्याच्या चौपदरीकरणाचे कामात बाधितांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(३०) * ४६७३२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मोहनराव कदम, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कसारा-डोळखांब (ता.शहापूर, जि.ठाणे) रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम सुरु असून या रस्त्याच्या कामामध्ये येणारा पुल ठेकेदाराने विनापरवानगी सुरुंग स्फोटाद्वारे तोडला असल्याचे दिनांक ३१ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुरुंग स्फोटामुळे येथील कातकरीवाडीतील ६ आदिवासींच्या घराला तडे गेले असून अनेकांच्या घरांचे पत्रे, कौले तुटले आहेत, तसेच या रस्त्याच्या कामासाठी ठेकेदाराने विनापरवानगी मोठ्या प्रमाणात झाडांची तोड केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी ठेकेदारावर कारवाई करुन स्फोटामुळे बाधित कातकरी आदिवासींना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) पूलाच्या पायाच्या खोदकामास सुरुवात करताना एकदाच नियंत्रित सुरुंग लावल्यानंतर एका घराच्या पत्र्यास छिद्र पडल्याची बाब निदर्शनास आली होती. तसेच कसारा ते डोळखांब भागामधील सा.बां.विभागाच्या जागेतील झाडांची तोड अद्याप केलेली नाही.
(३) संबंधित घराचा तुटलेला पत्रा बदलण्यात आला असून सदरील घटनेनंतर पोक्लेन वापरुन ड्रीलींग व चिझलींगने कठीण खडकात खोदकाम करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आंबोली (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) घाट रस्ता रुंदीकरण व संरक्षण कठडे दुरुस्त करण्याबाबत

**(३१) * ४७१६१ ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ४४४०९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील आंबोली घाटचा रस्ता अरुंद असून घाटाचे संरक्षक कठडे जीर्ण झाले आहेत, तसेच दरडी कोसळण्याचा धोका निर्माण झाला असल्याचे दिनांक १७ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंबोली घाटातील दरड कोसळल्याने वाहने आणि पर्यटकांना धोका निर्माण झाल्याने संरक्षण घाटाचे दुरुस्ती करणेबाबत शासनाकडे स्थानिकांनी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आंबोली घाट रस्त्यावरुन जाणारी अवजड वाहतूक बंद ठेवण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्याकडे प्रस्ताव पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आंबोली घाटाचे रस्ता रुंदीकरण व संरक्षण कठडे दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

प्रश्नांकित सावंतवाडी तालुक्यातील आंबोली घाटातील संरक्षक कठड्यांच्या काँक्रीटच्या आधार, संरक्षक भिंतीच्या दुरुस्तीचे काम वेळोवेळी करण्यात आलेले आहे.

सद्य:स्थितीत आंबोली घाटात दरडी कोसळून धोका निर्माण झाला असल्याबाबत निदर्शनास आलेले नाही. तसेच त्याबाबत कोणतेही निवेदन प्राप्त नाही.

(३) होय, प्रश्नांकित रा.मा. १८० वरील साखळी क्र. ५४/२०० मधील दगडी कमानी पुलाच्या सुरक्षिततेच्या कारणास्तव अवजड वाहनांची वाहतूक बंद करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

(४) आंबोली घाट जमीन वन विभागाच्या अखत्यारीतील आहे. त्यामुळे रुंदीकरणाचे काम हाती घेणे सद्य:स्थितीत शक्य नाही. तथापि, दरीकडील बाजूचे खराब झालेले व तुटलेले संरक्षक कठडे दुरुस्त करण्यात आले असून कमकुवत झालेल्या कठड्यांचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

सद्य:स्थितीत घाट रस्ता सुस्थितीत असून रस्त्यावरील वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग (कोकण विभागात) जिल्ह्यातील मत्स्यव्यवसायिकांच्या समस्याबाबत

**(३२) * ४७७९६ श्री.अनिकेत तटकरे, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक ४५०७१ ला दिनांक २६ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग (कोकण विभागात) जिल्ह्यात अनेक ठिकाणी मत्स्यव्यवसायीकांसाठी जेट्टी बांधून देण्याविषयी शासनामार्फत आश्वासीत करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाबार्ड मालिका-२० अंतर्गत रायगड जिल्ह्यातील थेरोंडा, एकदरा व नवापाडा येथील मच्छिमारांना मूलभूत सुविधा पुरविण्याच्या कामांना ६७.०० कोटी रकमेस शासन निर्णय दिनांक ०७/०१/२०१५ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून थेरोंडा व नवापाडा येथील कामे माहे जानेवारी, २०१६ मध्ये व एकदरा येथील काम माहे मे, २०१६ मध्ये सुरु झालेली कामे माहे मार्च, २०१९ अखेर पूर्ण करण्याचे आश्वासीत केले असूनही सदरहू कामे पूर्ण झाली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्रीवर्धन (जि.रायगड) व इतर ठिकाणी आधुनिक जेट्टी बांधण्यासाठी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, तसेच मत्स्यव्यावसायीकांच्या जेट्टी बरोबरच डिझेल साठ्या विषयी अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मत्स्यव्यवसायीकांसाठी जेट्टी बांधून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) होय.

(२) अंशतः खरे आहे. नवापाडा येथील काम पूर्ण झाले आहे. थेरोंडा व एकदरा येथील कामे अनुक्रमे ९० टक्के व ७५ टक्के जेट्टीची कामे पूर्ण झाली आहेत.

(३) व (४) हे खरे नाही.

श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील दिघी येथील जेट्टी बांधणेचे काम नाबार्ड मालिका २३ अंतर्गत मंजूर आहे. याशिवाय रायगड जिल्ह्यात नाबार्ड मालिका २२, २३ व २४ तसेच राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत वरेडी, बोर्ली मांडला, राजपुरी, नांदगांव या ठिकाणी मासळी उतरविण्याच्या ठिकाणी मच्छिमारांना मुलभूत सोयी सुविधा पुरविणेची एकूण ७४.५५ कोटी रकमेची ४ कामे मंजूर आहेत. यापैकी वरेडी बोर्ली-मांडला या कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले असून सी.आर.झेड. चे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यात येत आहे. उर्वरित दिघी राजपूरी व नांदगांव या कामाची सविस्तर अंदाजपत्रके तयार करणेचे व सी.आर.झेड. चे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.

डिझेल साठ्याविषयी अडचणी निर्माण झालेल्या नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) येथे मराठा भवन उभारण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३३) * ४७५८६ श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) येथे मराठा भवन उभारण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, रायगड यांना लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निर्णय घेऊन मराठा भवन उभारणीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) पनवेल, जि.रायगड येथे मराठा भवन उभारण्यासाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, रायगड यांच्यास्तरावर छाननी सुरु आहे.

-----------------

## रायगड व रत्नागिरी जिल्ह्याला जोडणाऱ्या बाणकोट-बागमांडला सागरी पुलाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(३४) * ४७३४८ श्री.रविंद्र फाटक : तारांकित प्रश्न क्रमांक ४४३५९ ला दिनांक १९ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बागमांडला (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) आणि बाणकोट (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) या दरम्यान खाडीवरील पुलाच्या बांधकामास दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली असून संबंधित कंत्राटदारास दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न केल्यास निविदा शर्तीनुसार कारवाई करण्यात येईल असे कंत्राटदारास शासनाकडून सूचित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सागरी पुलाचे काम पूर्ण झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सागरी पुलाचे काम पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदाराविरुध्द कारवाई करुन सदर पुलाची कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर काम दिनांक १३/४/२०१८ पासून बंद आहे.

काम बंद असल्यामुळे रुपये १.० लक्ष प्रतिदिन दंड आकारण्यात येत आहे. सदरहू पुल दोन पदरी मंजूर असून मलेशियन तंत्रज्ञान वापरून दोन पदरीचे चार पदरी करण्याबाबतचा प्रस्ताव क्षेत्रियस्तरावरून शासनास प्राप्त असून शासनस्तरावरून प्रस्तावाची छाननी सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील बालके गोवर आणि रुबेला लसीकरणाच्या प्रतिक्षेत असल्याबाबत

**(३५) * ४७०५२ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, अ‍ॅड.हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत दिनांक २७ नोव्हेंबरपासून गोवर आणि रुबेला लसीकरण करण्यात आले असून ८२ टक्के लसीकरण पूर्ण झाले असून पाच लाख बालके अजूनही लसीकरणाच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी डोंगरी, काळबादेवी, मोहम्मद अली रोड यांच्यासह भायखळा, कुर्ला (पश्चिम) आणि चेंबूर गोवंडी या भागातील काही शाळा अजूनही लसीकरण करुन घेण्यास तयार नाहीत तसेच, वांद्रे आणि सांताक्रुझमधील काही शाळांमध्ये लसीकरण करण्यास पालकांचा विरोध असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुबेला लस केंद्र शासनाकडून राज्य शासनाला उपलब्ध करुन देण्यात आली असून गोवर आणि रुबेला लसीकरणामुळे राज्यातील किती लहान मुलांना बाधा होऊन मृत्यू झाला आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने लसीकरण करुन न घेणाऱ्या संबंधित शाळांवर कारवाई करण्याबाबत तसेच, लसीकरणामुळे होणारे बालमृत्यू रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

गोवर रुबेला मोहिमेत २२६७३६५ मुलांना मुंबई महानगरपालिकेतर्फे लसीकरण करण्यात आले. महाराष्ट्र शासनाने गोवर रुबेला मोहिमेत मुंबई महानगरपालिकेला दिलेल्या उद्दिष्टानुसार मुंबईमध्ये एकूण ९०.१% उद्दिष्ट पूर्ण झाले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

मुंबईतील काही शाळांनी रुबेला लसीकरण करण्यास नकार दिला होता. त्या शाळेचे योग्य तऱ्हेने समुपदेशन केल्यानंतर सदर शाळांनी लसीकरण सत्र आयोजित करण्यास होकार दिला. परंतु, काही शाळांनी मोहिम संपेपर्यंत लसीकरण करण्यास नकार दिला. तसेच काही शाळेतील पालकांनी गोवर रुबेला लसीकरण करण्यास नकार दिला ही बाब खरी आहे.

(३) मुंबईसह राज्यामध्ये गोवर रुबेला लसीकरणामुळे एकही लहान मुलांना बाधा होऊन मृत्यू झालेला नाही.

(४) दिनांक २०/१२/२०१८ रोजी मा.आरोग्य मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे मौलवी/धर्मगुरु, लोकप्रतिनिधी यांची बैठक आयोजित करण्यात आली व यामध्ये गोवर-रुबेला लसीचे महत्व समजवून सांगण्यात आले. तसेच त्यांना मार्गदर्शन करण्यात आले की त्यांच्या भागातील लसीकरणास नकार देणाऱ्या पालकांना लसीकरणाचे महत्व पटवून लसीकरणास प्रवृत्त करण्यात यावे. राज्यस्तरावरुन शिक्षण विभागांतर्गत असलेल्या नकार देणाऱ्या शाळांमधील शिक्षकांना सहनियंत्रण अधिकारी म्हणून नेमण्यात आले व या शिक्षकांच्या मदतीने पालकांचा लसीकरणाबाबतचा गैरसमज दूर करण्याबाबत प्रयत्न करण्यात आले व लसीकरण करण्यात आले आहे.

जागतिक आरोग्य संघटनेचे प्रतिनिधी, IAP/IMA/रोटरी क्लबचे सदस्य यांनी नकार देणाऱ्या भागात/शाळांमध्ये जाऊन लसीकरणाचे महत्व समजवून सांगितले. राज्यस्तरावरुन प्रसिध्द पत्रकाची छपाई करण्यात आली. तसेच वेगवेगळया प्रसिध्दी माध्यमातून व्यापक प्रमाणात प्रसिध्दी करण्यात आली. उदा. प्रादेशिक व इंग्रजी वृत्तपत्रात सदर मोहिमेची जाहिरात, रेल्वे गाड्यांवरती जाहिरात, रेडिओ वाहिनीवरुन कार्यक्रम प्रसिध्दी, रेल्वे फ्लायओवर पुलावर जाहिरात, पोस्टर्स, बॅनर्स, माहिती पत्रके इ. तसेच AEFI Kit सर्व लसीकरण केंद्रांवर उपलब्ध करुन देण्यात आल्या. तसेच IAP च्या सहकार्याने AEFI Management Centers तयार केले.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कोतवालांना चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचा दर्जा देवून मानधनात वाढ करण्याबाबत

**(३६) * ४७८४७ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक ३७४१९ ला दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कोतवालांना चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचा दर्जा देवून मानधनात वाढ करावी या मागणीसाठी कोतवालांनी कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दिनांक ९ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील कोतवाल तसेच “पोलीस पाटील”, “आशा वर्कर्स” व “अंगणवाडी सेविका” या व अशा मानधनावर असलेल्या अन्य कर्मचाऱ्यांचा एकत्रित विचार करुन त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी “एकछत्र योजना” तयार करण्याकामी शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक १८ मार्च, २०१७ अन्वये अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली सचिव समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालाचे स्वरुप काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील कोतवालांना चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यासह मानधनात वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३), (४) व (५) कोतवालांना चतुर्थश्रेणी दर्जा देण्याबाबत संघटनेच्या मागणीच्या अनुषंगाने कोतवालांना चतुर्थश्रेणी दर्जा द्यावयाचा झाल्यास राज्यातील कोतवालांप्रमाणे इतरही मानधनावर असलेल्या कर्मचाऱ्यांचीही मागणी पुढे येण्याची शक्यता विचारात घेता, अशा मानधनावर कार्यरत असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचा एकत्रित विचार करुन त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी, त्यांच्यासाठी "एकछत्र योजना" तयार करण्याकामी अभ्यास करुन शासनास शिफारस करण्यासाठी महसूल व वन विभाग, दिनांक १८ मार्च, २०१७ च्या शासन निर्णयान्वये अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने आपल्या शिफारशींसह सादर केलेला अहवाल व तसेच कोतवालांच्या एकत्रित कामांचे स्वरुप, त्यांची पूर्णवेळ शासकीय कामाशी बांधीलकी विचारात घेता कोतवालांना देण्यात येणाऱ्या मानधनात सेवाजेष्ठतेनुसार मानधन वाढ करणे, त्यांना "राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात योजना", "अटल निवृत्तीवेतन योजना" व "महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना" या योजनांचा लाभ देणे व त्यांना चतुर्थश्रेणीच्या सरळसेवेच्या पदांमध्ये शिपाई म्हणून प्रथम नियुक्तीचा कोटा २५% वरुन ४०% पर्यंत वाढविणे अशा विविध शिफारशींच्या प्रस्तावास दिनांक ८ जानेवारी, २०१९ रोजीच्या मा.मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यानुसार दिनांक ०६/०२/२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

-----------------

## चिकलठाणा (औरंगाबाद) येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाकरीता स्वतंत्र पाण्याची पाईपलाईन देण्याबाबत

**(३७) * ४६९४४ श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिकलठाणा (औरंगाबाद) येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात १० खाटाचे चार वार्ड कार्यरत असून प्रतिदिन किमान १००० रुग्ण ओपीडीसाठी येत आहेत, सदर सामान्य रुग्णालय हे २०० खाटाचे असून रुग्णालयास महानगरपालिकेकडून केला जाणारा पाणीपुरवठा फारच कमी असल्याने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची पाणी टंचाईमुळे गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन पालकमंत्री यांनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये रुग्णालयासाठी पाण्याची स्वतंत्र पाईपलाईन देण्याची कार्यवाही करण्याचे आदेश दिले असूनही याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सामान्य रुग्णालयाने (मीनीघाटी) पाण्याच्या पाईपलाईनसाठी आवश्यक असणारा रुपये १.८७ कोटी निधीचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला असून त्यावर निर्णय झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सामान्य रुग्णालयासाठी आवश्यक निधी रुपये १.८७ कोटी उपलब्ध करुन पाण्याची स्वतंत्र पाईपलाईन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.

तथापि, जिल्हा रुग्णालय चिकलठाणा, औरंगाबाद येथे महानगरपालिकेकडून पाणीपुरवठा कमी होत असल्याने टॅकरव्दारा पाणी उपलब्ध करुन घेण्यात येत आहे. त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत नाही.

(२), (३) व (४) नवनिर्मित २०० खाटांचे जिल्हा रुग्णालय औरंगाबाद रुग्णालयास पाणीपुरवठा होण्यासाठी स्वतंत्र पाईपलाईनबाबतच्या रुपये १.८७ कोटीच्या अंदाजपत्रक व आराखड्यास दिनांक १० जून, २०१९ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर ते काटोल महामार्गाचे चौपदरीकरण करण्याबाबत

**(३८) * ४८२९० श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर ते काटोल महामार्गावर वाहनांची संख्या वाढल्यामुळे तसेच उक्त महामार्ग हा मोर्शी व अमरावती या शहराला जोडणारा असून येथे अवजड वाहनांची व बसेसची संख्या वाढल्यामुळे उक्त महामार्ग हा प्रवासासाठी अपूरा पडत असल्याने अपघाताचे प्रमाण वाढत असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महामार्गाचे सिमेंट चौपदरीकरण करण्याचे ई-भूमीपूजन माहे मार्च, २०१९ मध्ये करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भूमीपूजन होवूनही सदर कामास सुरुवात करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नागपूर ते काटोल महामार्गाचे सिमेंट चौपदरीकरण करण्याबाबत तसेच महामार्गालगत गावांसाठी चिंतनशील रहदारी चिन्हे (reflective traffic signs) व दिशाफलक, संपूर्ण महामार्गावर पथदिवे तसेच महामार्गाच्यामध्ये दुभाजक बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

नागपूर ते काटोल या ३५३ J राष्ट्रीय महामार्गावर कळमेश्वर MIDC Juction जवळ वारंवार अपघात होत असल्याचे पोलीस विभागाकडून सांगण्यात आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

उक्त महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात येणार असून सदर कामाचे ई-भूमीपूजन ८ मार्च, २०१९ रोजी करण्यात आले असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नागपूर यांनी कळविले आहे.

(३) व (४) अ) सद्य:स्थितीत चौपदरीकरणाच्या कामाची निविदा काढण्यात आली असून निविदा प्रक्रिया पूर्ण होवून करारनामा झाल्यावर सदर काम हाती घेण्यात येणार आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नागपूर यांनी कळविले आहे.

ब) सद्य:स्थितीत सदर महामार्गावर आवश्यक ठिकाणी रहदारी चिन्हे, दिशा फलक व रस्त्याच्या दोन्ही बाजूला Rumble Strips लावण्यात आले आहेत. तसेच या महामार्गावर आवश्यक ठिकाणी पथदिवे/दुभाजक बसविणे वगैरे बाबी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात येणाऱ्या चौपदरीकरण कामांतर्गत करणे संयुक्तिक राहील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई क्रिकेट असोसिएशन (एमसीए) च्या करार नुतनीकरण व थकीत कराची रक्कम शासनाकडे भरण्याबाबत

**(३९) * ४८५९७ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामदास आंबटकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने वानखेडे स्टेडिअमची जागा मुंबई क्रिकेट असोसिएशन (एमसीए) ला ५० वर्षांच्या करार पध्दतीने वापराकरीता दिली असून सदरहू करार माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान संपुष्टात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेच्या भाडेपट्टी नुतनीकरणासाठी मुंबई क्रिकेट संघटनेने मा.मुख्यमंत्री यांना पत्राद्वारे विनंती केलेली असून करार नुतनीकरण, थकीत कर आणि अनधिकृत बांधकाम प्रकरणी जिल्हाधिकारी, मुंबई यांनी मुंबई क्रिकेट असोसिएशन (एमसीए) ला दिनांक १६ एप्रिल, २०१९ रोजी नोटीस पाठवून असून स्टेडिअमचा वापर सुरु ठेवण्यासाठी रुपये १२० कोटी शासनाकडे जमा करण्याबाबत मुंबई क्रिकेट असोसिएशन (एमसीए) ला कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, करारानुसार मुंबई क्रिकेट असोसिएशन (एमसीए) शासनाला निर्माण क्षेत्राचे १ रुपये प्रती गज आणि रिकाम्या क्षेत्राचे १० पैसे प्रती गज अशाप्रकारे भाडे देणार होते, तसेच मुंबई क्रिकेट असोसिएशन (एमसीए) ने क्रिकेट सेंटर बनविल्यानंतर नवीन भाड्यांचा दावा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील** : (१) फोर्ट महसूल विभागातील भू.क्र. ९/१७७८ या मिळकतीचा भाडेपट्टा दिनांक ०६/०२/१९६८ पासून ५० वर्षांसाठी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, इलाखा शहर यांच्याकडून मुंबई क्रिकेट असोशिएशन यांना कराराने देण्यात आला असून सदर भाडेपट्ट्याचा कालावधी संपुष्टात आलेला आहे.

(२), (३) व (४) फोर्ट महसूल विभागातील भू.क्र. ९/१७७८ ही मिळकत दिनांक ०६/०२/१९६८ रोजी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, इलाखा शहर यांनी ५० वर्षांसाठी रुपये १ प्रती चौ.वार बांधीव क्षेत्रासाठी व १० पैसे प्रती चौ.वार मोकळ्या जागेसाठी या दराने मुंबई क्रिकेट असोसिएशनला भाडेपट्ट्याने दिलेली होती. सदर मिळकतीचा भाडेपट्टा दिनांक ०५/०२/२०१८

रोजी संपुष्टात आलेला आहे. सदर मिळकतीच्या भाडेपट्टा नुतनीकरणासाठी मुंबई क्रिकेट असोसिएशने दिनांक ०७/०४/२०१७ रोजीच्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री महोदयांना विनंती केलेली आहे.

भाडेपट्टाकरार नुतनीकरण, थकीत कर याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी मुंबई क्रिकेट असोसिएशनला दिनांक १६ एप्रिल, २०१९ रोजी नोटीस पाठविलेली आहे. सदर नोटीशीत मुंबई क्रिकेट असोशिएशनला भाडेपट्टा नुतनीकरणासाठी रुपये १२०,१६,१७,०८५/- भरणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी कळविले आहे. त्यानुषंगाने सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, मुंबई शहर कार्यालयामार्फत सुनावणी आयोजित करण्यात आली होती. तथापि, संबंधितांनी पुढील तारीख मिळण्याची विनंती केली असून तदनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत दिनांक १८/०६/२०१९ रोजी पुढील सुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईसह राज्यात राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्याबाबत

**(४०) * ४८६६१ श्री.नरेंद्र दराडे : तारांकित प्रश्न क्रमांक ४४१८८ ला दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील क्षयरोगाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी तसेच क्षय रुग्णांना वेळेत आणि योग्य उपचार मिळण्यासाठी राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत शासनाने ‘जीत’ प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस् येथे उद्घाटन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्प हा राज्यातील किती शहरांमध्ये राबविण्यात येणार आहे व त्याचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हा प्रकल्प राज्यातील १३ शहरांमध्ये राबविण्यात येणार आहे.

रायगड (ग्रामीण), मनपा-औरंगाबाद, भिवंडी-निजामपूर, कल्याण-डोंबिवली, कोल्हापूर, मिरा-भाईंदर, नाशिक, नवी मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, ठाणे, वसई, विरार प्रकल्पअंतर्गत स्वरुप खालीलप्रमाणे :-

१) शहरामधील खाजगी क्षेत्रातील आरोग्य संस्थाची यादी करुन त्यांचा कार्यक्रमांतर्गत सहभाग घेणे.

२) कार्यक्रमात सहभागी झालेल्या आरोग्य संस्थाकडून क्षयरुग्ण नोंदणी कार्यक्रमांतर्गत करणे.

३) खाजगी क्षेत्रात क्षयरोग निदान व पाठपुरावा करण्यासाठी थुंकी / इतर नमुने गोळा करणे, संबंधी प्रयोगशाळेत पोचविणे व चाचणी अहवाल संबंधी संस्थेला पोचविणे.

४) कार्यक्रमांतर्गत खाजगी क्षेत्रातील रुग्णांना उपलब्ध रोगनिदान सुविधा नि:शुल्क करुन देणे.

५) क्षयरुग्ण व क्षयरोग उपचार करणाऱ्यास अनुज्ञय असलेले मानधनाचा लाभ देणे.

६) कार्यक्रमांतर्गत उपलब्ध नि:शुल्क औषधोपचार खाजगी क्षेत्रातील क्षयरुग्णांना पुरविणे, तसेच औषधोपचार पूर्ण करण्यासाठी मदत करणे.

७) Drug Resistant क्षयरुग्णांना उपलब्ध सेवा मिळून देणे

८) विहित नमुन्यातील माहिती एकत्रित करुन निक्षयमध्ये भरणे.

९) रुग्णांना उपचार दरम्यान जर काही (Adverse Drug reaction) औषधांचे दुष्परिणाम आढल्यास त्याला संदर्भित करुन उपचार घेणे.

१०) रुग्णांना उपचार संपल्यानंतर त्याला निष्कर्श देणे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जव्हार व मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

**(४१) * ४८८७९ श्रीमती विद्या चव्हाण, अॅड.हुस्नबानू खलिफे, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) जव्हार व मोखाडा (जि.पालघर) येथील शेतपिकांवर माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१८ मध्ये विविध रोगाच्या प्रादुर्भावामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दुष्काळाच्या यादीत समाविष्ट करण्याबाबत तसेच बँकाकडून घेतलेले कर्ज माफ करण्याबाबतची मागणी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांनी तसेच 'समर्थन' संस्थेने मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री, मा.आदिवासी विकास मंत्री व जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे दिनांक ३ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्तांना दुष्काळग्रस्तांच्या यादीत समाविष्ट करुन नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) होय.
(२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक २१ फेब्रुवारी, २०१९ अन्वये खरीप हंगामातील अंतिम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या विविध जिल्ह्यातील ४५१८ गावांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करून खालील उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. या ४५१८ गावांमध्ये जव्हार व मोखाडा तालुक्यातील सर्व गावांचा समावेश आहे.

१) जमीन महसूलात सूट.
२) सहकारी कर्जाचे पुनर्गठन.
३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती.
४) कृषी पंपाच्या चालू विजबिलात ३३.५% सूट.
५) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी.
६) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता.
७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर.

८) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या कामास सुरुवात करण्याबाबत

**(४२) * ४६५१८ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ४१३३० ला दिनांक ६ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईजवळील अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या कामासाठी रुपये ३६०० कोटी खर्च करुन भव्य स्मारक उभारण्याचा दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ रोजी शासनाने घेतलेल्या निर्णयान्वये सदर प्रकल्पाचे मा.पंतप्रधानांच्या हस्ते दिनांक २४ डिसेंबर, २०१६ रोजी भूमीपूजन झाले असून स्मारकाच्या कामासाठी आवश्यक सर्व परवानग्या मिळूनही उक्त कामास सुरुवात करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्मारकाच्या कामासाठी आवश्यक निधीपैकी किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे व उर्वरित निधी केव्हा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, तसेच स्मारकाचे काम प्रत्यक्षात केव्हा सुरु करुन किती कालावधीत पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या कामास सुरुवात करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय, अंशत: खरे आहे.

कंत्राटदार मे.एल ॲण्ड टी लिमिटेड यांना दिलेल्या कार्यारंभ आदेशानुसार, त्यांच्यामार्फत भुस्तर सर्वेक्षण इ. कामे सुरु करण्यात आली होती. तथापि, मा.सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुमती याचिका SLP ३१९९७/२०१८ च्या प्रकरणी, दिनांक ११/०१/२०१९ रोजी झालेल्या सुनावणी वेळी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे सध्या काम स्थगित ठेवण्यात आले आहे.

(२) सदर कामासाठी सन २०१९-२० मध्ये रुपये १५० कोटी इतकी रक्कम उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच सदर कामाच्या प्रगतीनुसार व आवश्यकतेनुसार पुढील निधी उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे.

स्मारकाचे काम ३६ महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तथापि, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे पुढील काम सुरु करण्यात येईल.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई (जि.पालघर) समुद्रकिनाऱ्याजवळ अवैध रेती उपसा रोखण्याबाबत

**(४३) * ४६८८७ ॲड.अनिल परब, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) समुद्रकिनाऱ्याजवळ अवैधरित्या रेती उपशामुळे किनारे खचत असून वाळूची धूप होऊन समुद्राच्या लाटा उसळल्याने पर्यटकांच्या जीवास धोका निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी तक्रार करुनही स्थानिक महसूल अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत आहेत, तसेच सदरहू रेती उपसा हा स्थानिक महसूल अधिकारी व वाळू माफिया यांच्या संगनमताने होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैधरित्या रेती उपसा करणाऱ्या वाळू माफिया व त्यांना सहाकार्य करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात दूध उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत

**(४४) * ४७८९३ श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, अ‍ॅड.राहुल नार्वेकर, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामदास आंबटकर, श्री.रमेशदादा पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांना दिले जाणारे प्रति लिटर ५ रुपयाचे अनुदान शासनाने माहे नोव्हेंबर, २०१८ पासून बंद केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुदान बंद करण्याची कारणे काय आहेत, त्यामुळे राज्यात किती जिल्ह्यातील दुध डेअरी बंद करण्यात आल्या आहेत व किती शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे,
(३) असल्यास, अपुऱ्या पावसामुळे जनावरांचा चारा व पाण्याचा प्रश्न गंभीर झाला असून महागाईमुळे पशूखाद्याचे दर वाढले असताना शासनाने अनुदान बंद केल्यामुळे दुध उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बंद करण्यात आलेले अनुदान पूर्ववत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## टेंभुर्णी-लातूर व लातूर-नांदेड या रस्त्यांची कामे पूर्ण करण्याबाबत

**(४५) * ४६६९४ श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.बाळाराम पाटील, श्री.दत्तात्रय सावंत : दिनांक २९ नोव्हेंबर, २०१८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ८ मधील प्रश्न क्रमांक ४३१०० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेंभुर्णी ते लातूर या रस्त्याच्या दोन पदरीकरणाचे काम सन २०१८-१९ च्या आराखड्यात समाविष्ट करण्याठी केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असून सदर कामास केंद्र शासनाने तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी दिली आहे काय,

(२) असल्यास, लातूर ते नांदेड या रस्त्याच्या चौपदरीकरणाचे कामास केंद्र शासनाने मंजुरी दिली असून तुळजापूर लातूर-नांदेड हा NH ३६१ चा भाग असलेल्या रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लातूर ते नांदेड हा रस्ता तीन विभागामध्ये विभाजीत करण्यात आलेला असून यामध्ये अष्टीमोड व माळेगाव या ठिकाणी पथकर नाका बांधण्याचे काम अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने टेंभुर्णी-लातूर व लातूर-नांदेड या रस्त्यांच्या दुपदरी/चौपदरीकरणाची कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) टेंभूर्णी ते लातूर रा.म.क्र. ५४८ सी या रस्त्याच्या दुपदरीकरणाचा प्रकल्प अहवाल सन २०१८-१९ च्या आराखड्यात समाविष्ट होण्यासाठी केंद्र शासनास दिनांक २१/०७/२०१८ अन्वये पाठविण्यात आला आहे. सदर अहवालास केंद्र शासनाची तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी अदयाप प्राप्त होणे बाकी आहे.

(२) व (३) लातूर ते नांदेड हा राष्ट्रीय महामार्ग ३६१ चा भाग असून सदरील महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत हाती घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

लातूर ते नांदेड हा महामार्ग औसा ते चाकूर, चाकूर ते लोहा, लोहा ते वारंगा अशा तीन भागामध्ये विभाजीत करण्यात आला असून सदर चौपदरीकरण कामांचा ठेका ठेकेदार एम.इ.पी.लौंग जियान यांना देण्यात आला आहे. ठेकेदार यांना सदर कामे तात्काळ सुरु करण्याचे आदेश देण्यात आले असून कामाची सुरुवात लवकरच करण्यात येऊन दिनांक २४/०३/२०२१ पर्यंत पूर्ण होईल.

या कामामध्ये अष्टीमोड, ता.चाकूर, जि.लातूर व माळेगाव, ता.लोहा, जि.नांदेड या ठिकाणी पथकर नाका बांधण्यात येणार असून ते २४/०३/२०२१ नंतर कार्यान्वित होतील, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नांदेड यांनी कळविले आहे.

(४) अ) टेंभूर्णी ते लातूर या रस्त्याच्या दुपदरीकरणाचे काम सन २०१९-२० च्या वार्षिक अर्थसंकल्पात समाविष्ट करणे केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे. तरी सदर कामास केंद्र शासनाकडून तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाल्यानंतर सदर काम हाती घेण्यात येईल.

ब) लातूर-नांदेड चौपदरीकरणाचे काम लवकरच प्रत्यक्ष सुरु होत असून दिनांक २४/०३/२०२१ पर्यंत पूर्ण होईल, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नांदेड यांनी कळविले आहे.
त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी येथे महसूल आयुक्तालय स्थापन करण्याबाबत

**(४६) * ४६९६९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ४४९९५ ला दिनांक १९ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यासाठी स्थापन करण्यात येणारे दुसरे महसूल आयुक्तालय परभणी येथे स्थापन करण्यात यावे, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे सन २०१७-१८ मध्ये वा त्यादरम्यान केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयुक्तालय स्थापन करण्याबाबत मराठवाड्यातील लोकप्रतिनिधींची बैठक घेऊन अंतिम निर्णय घेतला जाईल असे आश्वासन मा.महसूल मंत्री महोदयांनी गतसत्रात सन २०१८ च्या हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने उत्तरादरम्यान दिले असून याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) व (३) औरंगाबाद विभागाचे विभाजन करुन परभणी येथे नवीन आयुक्तालय स्थापन करण्याच्या मागणी शिवाय नांदेड व लातूर येथे नवीन आयुक्तालय करणेबाबत ही मागणी करण्यात आली आहे. तथापि, सदर बाब धोरणात्मक तसेच आर्थिक दृष्ट्या खर्चिक असल्यामुळे शासन या संदर्भात यथावकाश सर्व संबंधितांशी विचारविनिमय करुन उचित निर्णय घेणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात वादळी वारे व अवकाळी पाऊसामुळे नुकसानग्रस्त फळबागायतदार शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

**(४७) * ४६४९९ श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिकेत तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, अॅड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.रामराव वडकुते, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले, डॉ.वजाहत मिर्झा, अॅड.हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: उस्मानाबाद, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, लातूर, यवतमाळ, नाशिक आणि मराठवाड्यात दिनांक २६ मार्च, २०१९, तसेच दिनांक ४, ५ व १६ एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान राज्यातील विविध भागात वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे हजारो हेक्टर शेती पिकांचे तसेच आंबा, केळी, मोसंबी, द्राक्ष इत्यादी फळ पिकांचे व घरांचे नुकसान झाले असून वादळी वाऱ्याने व वीज पडल्याने शेतकऱ्यांचे पशुधन मृत्यूमुखी पडून जिवितहानी व वित्तहानी झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फनी चक्री वादळामुळे कोकणातील वातावरण ढगाळ झाल्याने व तापमानात घट झाल्याने आंबा, काजू या फळ पिकाच्या उत्पन्नावर परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, फुलसावंगी (जि.यवतमाळ) येथील रेशीम शेतकऱ्यांचे अवकाळी पावसामुळे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून नाशिक जिल्ह्यात याच कालावधीत वीज कोसळून ४ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या नुकसानग्रस्तांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक २३ एप्रिल, २०१९ च्या शासन पत्रान्वये एप्रिल, २०१९ मध्ये गारपीटमुळे झालेल्या शेतीपिकांच्या व फळपिकांच्या झालेल्या नुकसानीचे संयुक्त पंचनामे करुन बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे आदेश क्षेत्रिय कार्यालयांना दिले आहेत.

तसेच, पशुधन व वित्त हानीबाबत पात्र बाधितांना मदत देण्याची कार्यवाही क्षेत्रियस्तरावर सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

(३) मौजे फुलसावंगी ता.महागांव, जि.यवतमाळ येथील सौ.केतकी पंकज मामीडवार यांच्या तुतीच्या (रेशीम) शेडचे नुकसान झाले आहे.

तसेच, नाशिक जिल्ह्यात दिनांक १४/०४/२०१९ रोजी ४ व्यक्ती व दिनांक १६/०४/२०१९ रोजी २ व्यक्तींचा वीज पडून मृत्यू झाला आहे. मृत व्यक्तींच्या वारसांना प्रत्येकी रुपये ४.०० लक्ष मदत अदा करण्यात आली आहे.

(४) दिनांक २३ एप्रिल, २०१९ च्या शासन पत्रान्वये एप्रिल, २०१९ मध्ये गारपीटमुळे झालेल्या शेतीपिकांच्या व फळपिकांच्या झालेल्या नुकसानीचे संयुक्त पंचनामे करुन बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे आदेश क्षेत्रिय कार्यालयांना दिले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील ढेकू औद्योगिक पट्ट्यामधील कारखान्यांनी शासनाचा महसूल बुडविल्याबाबत

**(४८) * ४७६२६ श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील ढेकू औद्योगिक पट्ट्यामध्ये असलेल्या १९ कारखान्यांनी शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडविला असून तसेच शासकीय नियमांचे उल्लघंन करुन मनमानीपणे कारखान्यांनी आपला कारभार चालविला असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारखान्यांच्या विरोधात नोटीसा बजावूनही कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नूषंगाने शासनाचा महसूल बुडविणाऱ्या कारखान्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) खालापूर तालुक्यातील ढेकू औद्योगिक पट्ट्यामध्ये एकूण १०८ कारखान्यांच्या नोंदी असून त्यापैकी ७४ कारखाने चालू आहेत, २२ कारखाने बंद आहेत व उर्वरित १२ कारखान्यांच्या मिळकतीवर उद्योग चालू करण्यात आले नसून मोकळी जागा अस्तित्वात आहे. सदर कारखान्याकडून चालू आर्थिक वर्षात महसूलापोटी रक्कम रुपये ३,२१,१०७/- वसुल करण्यात आली असून उर्वरित वसुलीची कार्यवाही सुरु आहे. तसेच ज्या कारखान्यांकडे महसूलाची थकबाकी आहे, त्यांचेविरुध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतूदीनुसार थकबाकी वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## शासनाच्या आपले सरकार सेवा केंद्रावरील सुविधा सुरु करण्याबाबत

**(४९) * ४७५३४ डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यात शासनाच्या आपले सरकार सेवा केंद्रावर मिळणारी आणि शेतकऱ्यांसाठी अत्यंत सुलभ असलेली ७/१२ आणि नमुना ८ अ ही सेवा मागील काही महिन्यांपासून बंद असल्याने शेतकऱ्यांची गैरसोय होत असल्याची बाब माहे मार्च, २०१९ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाच्या आपले सरकार सेवा केंद्रावरील सुविधा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) "आपले सरकार सेवा केंद्र" हे महाऑनलाईन या कंपनीचे वेब पोर्टलचा वापर करतात. महाऑनलाईनच्या वेब पोर्टलवर राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांच्या सर्व्हरमार्फत दिलेल्या लिंक मधून आपले सरकार सेवा केंद्राव्दारे गा.न.नं. ७/१२ काढण्याचा प्रयत्न केल्यास गा.न.नं. ७/१२ प्राप्त (fetch) होत नसल्याच्या तांत्रिक कारणांनी गा.न.नं. ७/१२ व ८ अ च्या प्रती शेतकऱ्यांना प्राप्त करण्यास फेब्रुवारी-मार्च, २०१९ मध्ये अडचण निर्माण होत होती. आज रोजी संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ साठी डिजिटल इंडिया भूमि अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम अंतर्गत विकसित प्रणाली सुरू असल्याने शेतकऱ्यांची कोणतीही गैरसोय नाही.

-----------------

## पटवर्धन कुरोली (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथे मुरुमांचे अवैधरित्या उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(५०) * ४६८३२ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पटवर्धन कुरोली (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील गायराज जमीन गट नं. ३५९ मधून दोन ठिकाणाहून रस्त्यांच्या कामासाठी कोणतीही परवागनी न घेता हजारो ब्रास मुरुमाचे उत्खनन करुन शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविला असल्याचे दिनांक १८ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पेहे-नरसिंहवाडी ते पटवर्धन कुरोली रस्त्याचे काम सुरु असून या रस्त्याच्या कामासाठी संबंधितांनी अनधिकृतपणे मुरुमाचे महसूल विभागाचे परवानगी न घेता उत्खनन केले असूनही संबंधित महसूल विभाग याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैधरित्या मुरुमाचे उत्खनन करणाऱ्यावर तसेच त्यांना सहकार्य करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) पटवर्धन कुरोली, ता.पंढरपूर, जि.सोलापूर येथील गायरान जमीन गट नं.३५९ मधून रस्त्याच्या कामासाठी अंदाजे २२०० ब्रास मुरुम या गौणखनिजाचे अवैध उत्खनन झाल्याचे दिनांक २८/३/२०१९ रोजी तलाठी, पटवर्धन कुरोली यांनी उपविभागीय अधिकारी, पंढरपूर व तहसिलदार, पंढरपूर यांना अहवाल पाठविला आहे. तसेच या प्रकरणी एका स्थानिक नागरिकाने दिनांक २/४/२०१९ रोजी जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे सदर ठिकाणाहून हजारो ब्रास मुरुमाचे अवैध उत्खनन झाले असताना तलाठ्याने फक्त २२०० ब्रास इतकाच पंचनामा केल्याबाबत व सदर उत्खनन करणाऱ्या कंपनीवर कोणतीही दंडात्मक कारवाई झाली नसल्याबाबत तक्रार अर्ज केलेला आहे.
(२) व (३) पटवर्धन कुरोली, ता.पंढरपूर, जि.सोलापूर येथील गायरान जमीन गट नं. ३५९ या ठिकाणाहून झालेल्या गौण खनिजाच्या अवैध उत्खननाप्रकरणी संबंधितांविरुध्द दिनांक ६/६/२०१९ रोजी रुपये २,२८,८०,०००/- इतक्या दंडात्मक रक्कमेचे आदेश तहसिलदार, पंढरपूर यांनी पारित केले आहेत. तसेच गौण खनिजाच्या अनधिकृत उत्खननाच्या परिमाणाची स्थानिक नागरिकाच्या तक्रार अर्जानुसार फेर गणना करण्यासाठी उपविभागीय अधिकारी, पंढरपूर यांनी दिनांक २९/५/२०१९ अन्वये संयुक्त पथक स्थापन केले आहे. सदर पथकाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: नागपूर जिल्हा परिषद ग्रामीण प्राथमिक आरोग्य केंद्रात सेवा देणाऱ्या डॉक्टरांचे वेतन अदा करण्याबाबत

**(५१) * ४८३३३ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: नागपूर जिल्हा परिषदेत ११ महिन्यांच्या करार पध्दतीने ग्रामीण प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रावर ४५० डॉक्टरांची पदे भरण्यात आली, सदर डॉक्टरांचे वेतन ४ महिन्यांपासून थकित राहिल्याने डॉक्टरांनी आरोग्य केंद्रातील सेवा सोडून दिली असल्याने सदरहू आरोग्य केंद्रातील पदे रिक्त झाली असल्याचे दिनांक १३ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉक्टरांचे वेतन अदा न केल्याने सदरहू निधी शासनाकडे परत गेला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासकीय रुग्णालयात सेवा देणाऱ्या डॉक्टरांना वेतन अदा न करणाऱ्यांवर कारवाई करुन डॉक्टरांचे वेतन त्यांना अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात एकूण ७७५ वैद्यकीय अधिकाऱ्यांची कंत्राटी तत्वावर नेमणूक करण्यात आली आहे. त्यापैकी जिल्हा परिषद नागपूर अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रात एकूण ३० कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यातील १८ वैद्यकीय अधिकारी यांनी वैयक्तीक कारणास्तव राजीनामा दिला आहे.

(२) सदर निधी विहित मुदतीत खर्च न झाल्याने व्यपगत झाला.

(३) व (४) संबंधित जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांच्यावर जिल्हा परिषद नागपूर प्रशासनामार्फत शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येत आहे. कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांना माहे डिसेंबर, २०१८ व जानेवारी, २०१९ या कालावधीचे मानधन अदा करण्यात आले असून उर्वरीत कालावधीचे मानधन अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## नागपूर येथील महाराजबाग प्राणीसंग्रहालयाची मान्यता रद्द केल्याबाबत

**(५२) * ४८३७३ श्री.रामदास आंबटकर, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील प्रशासनाच्या दुर्लक्षपणामुळे व आवश्यक त्या अटीची पूर्तता न केल्याने महाराजबाग प्राणीसंग्रहालयाची मान्यता केंद्रीय प्राणीसंग्रहालयाने रद्द केल्याचे दिनांक ५ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्राणीसंग्रहालयाचे व्यवस्थापन अद्यावत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल बोंडे :** (१) होय.

(२) केंद्रिय प्राणीसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी प्रशासकीय व्यवस्था, पशुवैद्यकीय व्यवस्था, पिंजऱ्याचे अद्यावतीकरण, प्रेक्षकांची व्यवस्था व इतर सर्वांगीण विकास अपेक्षेप्रमाणे होत नसल्याच्या कारणासाठी प्राणीसंग्रहालयाची मान्यता रद्द केली होती. त्यावर आवश्यक उपाययोजना म्हणून प्राणीसंग्रहालयाचे पिंजरे अद्यावत करण्यासाठी व एकंदरीत पायाभूत सुविधा सुधारणा व संसाधनाचा विकास करण्यासाठी बृहत विकास आराखडा केंद्रिय चिडीयाघर प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. प्राणीसंग्रहालयासाठी आवश्यक ७१ पदांचा प्रस्ताव डॉ.पंजाबराव देशमुख कृषी

विद्यापीठाच्या मा.कार्यकारी परिषदेच्या मान्यतेने महाराष्ट्र शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे. तातडीची व्यवस्था म्हणून अतिशिघ्र कार्याकरीता स्थानांतरणाने/कंत्राटी पध्दतीने प्राणीसंग्रहालयामध्ये प्रभारी अधिकारी (निर्देशक), पशुवैद्यकीय अधिकारी, प्राणीसंग्रहपाल, शिक्षण अधिकारी आणि प्राणीपालांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

प्राणीसंग्रहालयाची मान्यता रद्द केल्याप्रकरणी केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालय, नवी दिल्ली येथे अपील सादर करण्यात आले. सदर अपीलावर दिनांक ११/०३/२०१९ रोजी सुनावणी होऊन अटी व शर्तींच्या अधिन राहुन प्राणीसंग्रहालयाची मान्यता एका वर्षासाठी वाढविण्याबाबत मौखिक आदेश झालेले आहेत.

(३) संबंधित नाही.

-----------------

## राज्यात फलोत्पादनाला चालना देण्याबाबत

**(५३) * ४७००२ श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात फलोत्पादन क्षेत्रातील फळांचे उत्पादन ७ लाख टन ने कमी होणार असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन फलोत्पादनाला चालना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयदत्त क्षीरसागर :** (१) नाही.

सन २०१७-१८ मध्ये १०८.९१ लाख मे.टन उत्पादन झाले होते. सन २०१८-१९ मध्ये ते ९९.९२ लाख म्हणजे सन २०१७-१८ पेक्षा ८.९९ लाख मे. टनाने कमी दिसत असले तरी सदरची आकडेवारी अंतरिम असल्याने मागील वर्षाच्या तुलनेत उत्पादन कमी झाल्याचे स्पष्ट होत नाही. याबाबतची अंतिम

आकडेवारी प्राप्त झाल्यावरच स्पष्टता होणार आहे. त्यामुळे फळाचे उत्पादन ७ लाख टनाने कमी होणार असल्याचे म्हणता येणार नाही.

(२) राज्यात सन २०१८-१९ मध्ये सरासरीच्या ७४% पर्जन्यमान झाले असून, काही जिल्ह्यामध्ये सरासरीच्या ५०% पेक्षा कमी पर्जन्यमान झाले आहे. कमी पर्जन्यमान झाल्यामुळे फळपिकांची उत्पादकता टिकवून ठेवण्याकरीता शेतकऱ्यांना सेंद्रीय व प्लास्टीक आच्छादन (मलचिंग) बाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे. त्याचबरोबर झाडांची विरळणी, ठिबक सिंचनाद्वारे पाणी देणे इत्यादी उपाययोजना करण्यात आल्या आहेत. तसेच मागील वर्षी राज्यात फळपिकांकरीता २६२४५ हेक्टर क्षेत्रावर प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत अनुदानित ठिबक संच बसविण्यात आले असून शेतकऱ्यांच्या मागणीनुसार मागेल त्याला शेततळे खोदण्याकरीता अनुदान देण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील विहिरीच्या बांधकामाकरीता निधी देण्याबाबत

**(५४) * ४७२९३ श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हा परिषद कृषी विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेंतर्गत १८० लाभार्थ्यांची विहिरीसाठी निवड करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेष निधीची कपात आणि अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष यामुळे सदरहू योजनेंतर्गत विहिरीच्या बांधकामाकरीता केवळ रुपये १ लाख ८० हजार इतका कमी निधी उपलब्ध करुन दिल्यामुळे विहिरीचे बांधकाम पूर्ण होऊ शकले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू विहिरींचे बांधकाम पूर्ण होण्याकरीता लाभार्थ्यांना पूर्ण अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल बोंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. तथापि, सदर योजनेत आर्थिक लक्षांकाच्या मर्यादेत नविन विहिर बाबीच्या पात्र लाभार्थीमधून एका लाभार्थ्यांची निवड करण्यात आली असून निवड झालेल्या लाभार्थीचे नविन विहिर खोदकाम सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती-सुरत या महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(५५) * ४७२१४ श्री.गोपिकिशन बाजोरीया : दिनांक २९ नोव्हेंबर, २०१८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ८ मधील प्रश्न क्रमांक ४१६२४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती-सुरत या महामार्गाच्या चौपदरीकरणाचे कामाची मुदत करारनाम्यानुसार सन २०१९ पर्यंतच असतानाही चौपदरीकरणाचे काम अत्यंत संथगतीने सुरु असून सद्य:स्थितीमध्ये सदर महामार्गाच्या चौपदरीकरणाचे २० ते २५ टक्केच काम पूर्ण झाले असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती ते नवापूरपर्यंतच्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहाच्या चौपदरीकरणाचे काम गेल्या पाच महिन्यांपासून ठप्प असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून उक्त काम आय.एल.एफ.एस. कंपनीच्या आर्थिक अडचणीमुळे सन २०१३ पासून विविध कारणांमुळे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने चौपदरीकरणाचे काम पूर्ण होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

अमरावती-सुरत या महामार्गामधील महाराष्ट्रातील अमरावती ते नवापूर पर्यंतच्या एकूण सुमारे ४८४ कि.मी. लांबीच्या चौपदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आले आहे.

यापैकी अमरावती ते चिखली पर्यंतच्या सुमारे १९४ कि.मी. पर्यंतच्या लांबीतील काम सुमारे २५ टक्के पूर्ण झाले असून सद्य:स्थितीत आय.एल.एफ.एस. कंपनीच्या आर्थिक अडचणीमुळे बंद असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, अमरावती यांनी कळविले आहे.

तसेच चिखली ते फागणे या भागातील मिळून सुमारे १५० कि.मी.चे काम सुमारे १५-२०% पूर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, जळगांव यांनी कळविले आहे.

शिवाय फागणे ते गुजरात महाराष्ट्र सीमेपर्यंतच्या सुमारे १४० कि.मी.लांबीतील काम सुमारे ६५.५०% पूर्ण झाले आहे व उर्वरित काम सवलतदाराच्या आर्थिक अडचणीमुळे मागील सुमारे ९ महिन्यांपासून बंद स्थितीत असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, धुळे यांनी कळविले आहे.

(३) सदर प्रकरणी संबंधित प्रकल्प संचालक यांचेमार्फत प्राप्त झालेली माहिती पुढीलप्रमाणे आहे.

अ) सदर कामापैकी अमरावती ते चिखली पर्यंतचे सवलतदाराने केलेल्या कामाचे मुल्यांकन तसेच उर्वरित चौपदरीकरणाचे काम स्वतंत्ररित्या पूर्ण करण्यासाठीचे अंदाजपत्रक करण्यासाठी केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत दिनांक २६/०४/२०१९ च्या पत्रान्वये संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत.

ब) चिखली ते फागणे या भागातील काम प्रगतीपथावर असून सदर काम जुलै, २०२१ पर्यंत पूर्ण करण्यात येईल.

क) फागणे ते गुजरात महाराष्ट्र सीमेपर्यंतच्या भागामध्ये सद्य:स्थितीत सवलतदाराच्या जबाबदारीवर व खर्चाने खड्डे भरण्याचे काम हाती घेण्यात आले असून अस्तित्वातील रस्त्याच्या दुरुस्तीसाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत. तसेच प्रकल्पातील उर्वरित चौपदरीकरणाचे काम स्वतंत्ररित्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही हाती घेण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिशोर (ता.कन्नड, जि.औरंगाबाद) ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीची पुनर्बांधणी करण्याबाबत

**(५६) * ४७८८९ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: पिशोर (ता.कन्नड, जि.औरंगाबाद) ग्रामीण रुग्णालयाची इमारत ९० वर्षे जुनी व जीर्ण झाल्याने इमारतीची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिशोर ग्रामीण रुग्णालयात रुग्ण तपासणी करीता गेले असता रुग्णालयाच्या छताचा भाग टेबलावर कोसळल्याने रुग्णालयात दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णलयाच्या इमारतीचे लेखापरिक्षण करुन नवीन इमारत बांधण्याकरीता सन २०१६ पासून विभागाद्वारे अनेकवेळा लेखी मागणी करण्यात येऊनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील विशेषत: पिशोर रुग्णालयातील इमारतीचे लेखापरिक्षण करुन दुरवस्थेत असलेल्या रुग्णालयाच्या इमारतींची पुनर्बांधणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे
(३), (४) व (५) या संदर्भात उपभोक्ता विभागाकडून मान्यता मिळाल्यानंतर सा.बां.विभागाकडून कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## भोकर (जि.नांदेड) तालुक्यात महानेट प्रकल्पांतर्गत विनापरवाना ऑप्टिकल फायबर केबल टाकण्यात आल्याबाबत

**(५७) * ४७२५५ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोकर (जि.नांदेड) तालुक्यात शासनाच्या महानेट प्रकल्पांतर्गत विनापरवाना ऑप्टिकल फायबर केबल टाकण्याचे काम कंत्राटदाराकडून सुरु असल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भोकर-उमरी रस्त्यावर या कामासाठी खोदकाम करताना वृक्षतोडी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विनापरवानगी कामे करणाऱ्या कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र.GAD-मातंस ०८३२/३/२०१८-DIR-DIT(MH) दिनांक १७/०२/२०१८ नुसार महानेट प्रकल्पासाठी राज्यातील मार्गाच्या हक्कासाठी (भूमिगत आणि हवाई) परवानगी घेण्यापासून सुट देण्यात आलेली आहे.
(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात एचआयव्ही संसर्ग रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(५८) * ४७०३३ श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक ४४८९६ ला दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ एप्रिल, २०१८ ते दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ या कालावधीमध्ये एचआयव्हीमुळे होणाऱ्या मृत्यूंची संख्या १ हजार ५०९ इतकी नोंदविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात मागील तीन वर्षात एचआयव्ही नियंत्रणात आला असे समजून लोकसंख्येतील प्रत्येक घटकात घेण्यात येणाऱ्या चाचण्या थांबविण्यात आल्या आहेत, तसेच निधीही थांबविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात एचआयव्ही संसर्ग रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: हे खरे आहे.

राज्यात दिनांक ०१/०४/२०१८ ते दिनांक २८/०२/२०१९ या कालावधीमध्ये एचआयव्हीमुळे होणाऱ्या मृत्यूंची संख्या २४६० इतकी नोंदविण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापि, राष्ट्रीय एड्स नियंत्रण संघटनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार संसर्ग रोखण्याच्या सर्व उपाययोजना केल्या जातात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोकण किनारपट्टीवरील जमिनी मच्छिमारांच्या नावे करण्याबाबत

**(५९) * ४७७४५ ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कोकण किनारपट्टीवरील मच्छिमारांच्या राहत्या घरांच्या व मासळी सुकवण्याच्या जमिनी ७/१२ उताऱ्यावर नावे करण्याच्या संदर्भात शासनाने निर्णय घेवूनही रत्नागिरी व सिंधुदुर्गात कोणतीही कार्यवाही होत नसल्याचे दिनांक ९ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मच्छिमारांची गावे व कोळीवाडे यांचे सिमांकन करुन त्यांची राहती घरे व मासळी सुकविण्याच्या जमिनी ७/१२ उताऱ्यावर नोंद घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) राज्यातील सागरी किनारपट्टीवरील मच्छिमार गावांमधील जमिनी सरसकट कोळी बांधवांच्या नावावर करण्याबाबत शासनस्तरावरून आदेश देण्यात आलेले नाहीत. तथापि, शासन परिपत्रक क्र. एलएनडी१०८१/सी१७२/सीआर/२४१५/म-६, दिनांक ०४/०२/१९८३ अन्वये मच्छिमारांच्या धंदयासाठी, म्हणजेच जाळी सुकविणे/विणणे, मासे सुकविणे, बोटी शाकारणे/दुरुस्त करणे याकरीता मच्छिमारांच्या गावालगत/वसाहती लगतच्या सोयीस्कर खुल्या जागा महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या कलम २२ खालील तरतुदींनुसार अभिहस्तांकित करण्याच्या सूचना शासनाने जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यामध्ये शासकीय जमिनीचे ४७.६२.५० हे.आर. क्षेत्र प्रत्यक्ष मच्छिमारांच्या घराखाली असून सदरचे क्षेत्रापैकी ०.६४.०० हे.आर. क्षेत्रावर गा.न.नं. ७/१२ चे इतर हक्कात नोंद घेण्यात आली आहे. तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड, दापोली व रत्नागिरी तालुक्यातील मासळी सुकविण्यासाठी विहित केलेल्या ०.३६.७० हे.आर क्षेत्राची नोंद गा.न.नं. ७/१२

सदरी इतर हक्कात घेण्यात आली आहे. उर्वरित मासळी सुकविण्याच्या वहिवाटीखालील शासकीय जमिनीचे क्षेत्राबाबत संबंधित मच्छिमार अगर मच्छिमार संस्थाकडून मच्छिमारांच्या मासळी सुकविणे, जाळी सुकविणे, जाळी विणणे, बोटी दुरुस्ती करणे, बोटी शाकारणे या प्रयोजनासाठी जमीन मागणीबाबतचे प्रस्ताव प्राप्त करुन ते विहित कागदपत्रासहीत सादर करण्याबाबत, सहा.आयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग, रत्नागिरी यांना जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडून कळविण्यात आले असून, अशाप्रकारचे प्रस्ताव जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्या कार्यालयास प्राप्त झालेले नाहीत. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर मच्छिमारांचे रहात्या घराखालील व मासळी सुकविण्याच्या जागा/गावठाण जमिनीचे उपअधीक्षक, भूमिअभिलेख यांचेमार्फत सर्वेक्षण करुन जमीनधारकांचे हक्क सिध्द झालेनंतर त्यांना अनुसूची “क” प्रमाणे सनद प्रदान करणेची कार्यवाही नियोजित आहे.

तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यात शासन परिपत्रक दिनांक ०४/०२/१९८३ अन्वये सावंतवाडी उपविभागातील वेंगुर्ला तालुक्यातील वेळागर येथील स.नं. ३८ हि.नं. २ पो.ख. क्षेत्र ०२.९७.०० हे. आर. पैकी ००.४०.०० हे.आर. एवढे क्षेत्र मच्छिमारांसाठी जाळी सुकविणे, होड्या ठेवणे या प्रयोजनार्थ जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्या दिनांक २६/०६/१९९१ च्या आदेशाने सदरची जागा राखून ठेवून त्याबाबत अधिकार अभिलेखामध्ये इतर हक्कात नोंद ठेवणेत आलेली आहे. नवाबाग, ता.वेंगुर्ला येथील स.नं. ९ हि.नं.० पो.ख. क्षेत्र २.१८.० हे. आर. ही शासकीय जमीन असून अधिकार अभिलेखात मासळी आवार, सॉल्ट डिपार्टमेंट, प्रोव्हिजनली ट्रान्सफर्ड टु डिपार्टमेंट ऑफ इंडस्ट्रीज यांचे नावे दाखल आहे. कणकवली उपविभागातील देवगड व कुडाळ उपविभागातील मालवण तालुक्यात सागरी किनाऱ्यालगत छोट्या मच्छिमार लोकांची वस्ती असून घराच्या आजुबाजूला असलेल्या मोकळ्या जागेचा वापर मासळी सुकविण्यासाठी करत असून सदरची जागा ही आज त्यांच लोकांचे नावे गा.न.नं. ७/१२ मध्ये दाखल आहेत. देवगड, मालवण व वेंगुर्ला तालुक्यातील समुद्रकिनाऱ्यालगतच्या जागा मासे सुकविणे, जाळी सुकविणे, जाळी विणणे, होडी दुरुस्ती करणे, बोटी शाकारणे इ. करीता राखीव ठेवणेबाबत १ निवेदन व १ अर्ज जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना प्राप्त झालेला असून दिनांक ०४/०२/१९८३ च्या शासन परिपत्रकान्वये कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## कोकण किनारपट्टीवर धुपप्रतिबंधक बंधारे बांधण्याबाबत

**(६०) * ४७९९७ श्री.अनिकेत तटकरे, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक ४४४०६ ला दिनांक २६ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील अनेक गावांमध्ये धूपप्रतिबंधक बंधारे फुटल्याने नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकण किनारपट्टीवरील गावे वाचविण्यासाठी व पर्यावरण रक्षणासाठी धूपप्रतिबंधक बंधारे बांधण्याची आवश्यकता असून याबाबत नुकसानग्रस्त गावातील शेतकऱ्यांनी वेळोवेळी मागणी करुनही अनेक ठिकाणी धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्यात आले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोकण किनारपट्टीवर धुपप्रतिबंधक बंधारे बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) नुकसानग्रस्त गांवातील शेतकऱ्यांनी वेळोवेळी मागणी केल्यानुसार अंर्थसंकल्पीय अंदाजात धुपप्रतिबंधक बंधाऱ्यांची कामे मंजूर करण्यात आली आहेत. सदर कामे पर्यावरणविषयक परवानगी (CRZ Clearance) अभावी प्रलंबित आहेत.

(३) सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात ठाणे, पालघर, रत्नागिरी, रायगड व सिंधुदुर्ग जिल्हयांकरीता रुपये ९६ कोटी अंदाजित किंमतीची ४९ कामे समाविष्ट करण्यात आली असून सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात रुपये ३.६५ कोटीची तरतूद करण्यात आली आहे. रुपये ७७.५० कोटी अंदाजित किंमतीच्या ४२ कामांच्या निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून पर्यावरण आघात मुल्यांकन समितीतर्फे (SEIAA) पर्यावरण परवानगी प्राप्त ७ कामांना कार्यादेश देण्यात आले आहेत. उर्वरीत ३५ कामांना महाराष्ट्र राज्य किनारपट्टी व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA) यांचेकडून CRZ Clearance

बाबत SEIAA समितीस शिफारस करण्यात आली आहे. SEIAA ने कळविल्यानुसार सदर कामांना मॅनग्रुव्ह मुंबई यांच्याकडून परवानगी मिळण्याकरीता पत्तन अभियंता, रत्नागिरी यांनी दिनांक १६/०४/२०१९ च्या पत्रान्वये अप्पर प्रधान मुख्य वनरक्षक, मुंबई यांना कळविले आहे.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात ठाणे, पालघर, रायगड व सिंधुदुर्ग जिल्हयांसाठी रुपये ८६.८५ कोटी अंदाजित किंमतीची ४३ कामे मंजूर करण्यात आली असून सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात रुपये ३.३१ कोटी निधीची तरतूद केली आहे. सदर कामांना MCZMA कडून पर्यावरण विषयक परवानगी मिळणेकरीता सल्लागार (IIT Powai Consultant) नेमलेले आहेत.

सन २०१८-१९ मध्ये रुपये २४.९० कोटी रक्कमेची ३ कामे मंजूर असून या कामांसाठी सन २०१८-१९ मध्ये रुपये ०.९१ कोटी अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध केली आहे. सदर कामांपैकी १ काम प्रगतीपथावर असून २ कामे निविदास्तरावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात कृषी अधिकाऱ्यांनी मृद संधारणाच्या कामात गैरव्यवहार केल्याबाबत

**(६१) * ४७५९७ श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार** : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना कृषी सल्ला आणि योजनांची माहिती देण्याऐवजी कृषी अधिकाऱ्यांनी मृदसंधारणातील रुपये ३५ कोटींचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी २९ कर्मचाऱ्यांवर माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणत्या अधिकाऱ्यांवर कोणत्या कलमान्वये गुन्हे दाखल करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, उक्त प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल बोंडे :** (१) सन २०१०-११ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा व मोहोळ तालुका कृषी अधिकारी कार्यालयांतर्गत मृद व जलसंधारणाच्या कामांमध्ये झालेली अनियमितता व अपहार झाल्याची शक्यता विचारात घेऊन या प्रकरणातील सर्व संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत दिनांक १५/१०/२०१८ च्या पत्रान्वये आयुक्त (कृषी) यांना आदेश देण्यात आले आहेत.

(२) या प्रकरणी २९ अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द पोलीस स्टेशन, मंगळवेढा येथे एफ.आय.आर. क्र.०१५६, भारतीय दंड संहिता १८६० अंतर्गत कलम ४०३, ४०९, ३४ अन्वये दिनांक ०१/०४/२०१९ रोजी फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच संबंधितांविरुध्द दिनांक १७/०२/२०१७ च्या ज्ञापनान्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील पशुवैद्यकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(६२) * ४७३५२ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाली, चव्हाणवाडी आणि जांभुळपाडा (ता.सुधागड, जि.रायगड) या ठिकाणी श्रेणी-१ व वाघोशी खवली आणि नांदगाव येथे श्रेणी-२ च्या असलेल्या दवाखान्यामध्ये पशुवैद्यकिय अधिकारी व अन्य पदे रिक्त असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दवाखान्यात पशुवैद्यकिय अधिकारी, विस्तार अधिकारी, आणि पशुधन पर्यवेक्षक ही तीनही पदे रिक्त असल्याने जनावरांना उपचारासाठी अन्य ठिकाणी घेवून जावे लागत असून अनेकवेळा उपचाराअभावी जनावरे दगावत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील पशुवैद्यकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर** : (१) रायगड जिल्ह्यातर्गत सुधागड तालुक्यामध्ये पशुधन विकास अधिकारी या संवर्गात ४ मंजूर पदे आहेत. मौजे चव्हाणवाडी, पाली व जांभुळपाडा येथे श्रेणी-१ ची पशुवैद्यकीय दवाखाने कार्यरत असून त्यापैकी जांभुळपाडा येथे नियमित पशुधन विकास अधिकारी कार्यरत आहेत. चव्हाणवाडी, पाली व पाली (विस्तार) येथील पशुधन विकास अधिकाऱ्यांची ३ पदे रिक्त आहेत.

तसेच खवली, वाघोशी व नांदगाव येथे श्रेणी-२ चे दवाखाने असून सदर तिनही दवाखान्यांमध्ये नियमित पशुधन पर्यवेक्षक कार्यरत आहेत. सुधागड पाली (विस्तार) येथील पशुधन पर्यवेक्षकाचे १ पद रिक्त आहे. याव्यतिरिक्त गट-ड संवर्गातील ८ मंजूर पदांपैकी ५ पदे भरलेली असून ३ पदे रिक्त आहेत.
(२), (३) व (४) रायगड जिल्ह्यांतर्गत सुधागड तालुक्यात वर नमूद केल्यानुसार पदे रिक्त असली तरी सदर रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकारी/कर्मचारी यांच्याकडे सोपवून पशुपालक धारक शेतकऱ्यांच्या जनावरांना नियमितपणे पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत असून उपचाराअभावी जनावरे दगावण्यात आलेली नाही.

पशुधन विकास अधिकारी, गट-अ या संवर्गातील रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने ४३५ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आलेले आहे. आयोगाकडून पात्र उमेदवार उपलब्ध झाल्यानंतर या संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत जिल्हा परिषद, रायगड यांच्याकडून कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## मुंबईत कुष्ठरोग आजार नियंत्रणात आणण्याबाबत

**(६३) * ४७०८१ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.आनंदराव पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४६२७१ ला दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत कुष्ठरोगाच्या रुग्णांमध्ये वाढ झाल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कुष्ठरोग आजार नियंत्रणात आणण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबई जिल्ह्यात माहे फेब्रुवारी, २०१९ अखेर ४३५ नविन रुग्ण आढळले. माहे फेब्रुवारी, २०१६, २०१७ व २०१८ अखेर अनुक्रमे ४२६, ४०९ व ४०१ नविन रुग्ण आढळलेले आहे.

(२) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येते.

- नविन रुग्णांची नोंदणी करुन बहुविध औषधोपचाराची मात्रा देण्यात येते.
- नविन रुग्णांच्या सहवासितांची तपासणी करण्यात येते.
- नविन रुग्णांच्या घराभोवतीच्या ३०० घरांचा क्लस्टर सर्व्हेक्षण केला जातो.
- शालेय आरोग्य तपासणी.
- सतत ३ वर्ष शुन्य रुग्ण असलेल्या कार्यक्षेत्राचा सर्व्हेक्षण.
- हार्ड टु रिच भागासाठी विशेष कार्यक्रम राबविणे.

- मुंबई जिल्ह्यात प्रथमच राबविलेल्या कुष्ठरोग शोध मोहिमेंतर्गत (२४ सप्टेंबर, २०१८ ते ९ ऑक्टोंबर, २०१८) १६५४० संशयित शोधले व त्यापैकी ५२ नविन रुग्ण मिळाले.
- स्पर्श मोहिम ३० जानेवारी, २०१९ पासून सुरु झालेल्या पंधरवाड्यात लवकर कुष्ठरुग्ण शोधणे व कुष्ठरोगाविषयक घृणा कमी करण्यासाठीची विशेष अंशी लोकशिक्षण मोहिम स्पर्श या नावाने मुंबईमध्ये आयोजित करण्यात आली होती.
- तसेच विविध आरोग्य शिक्षण कार्यक्रमांतर्गत महिला मंडळ सभा प्रश्न मंजुषा कार्यक्रम प्रभातफेरी, खाजगी वैद्यकीय व्यवसायिक कार्यशाळा इ.उपक्रम मुंबई जिल्ह्यात राबविण्यात येतात.
- समाजात लपून राहिलेले कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधण्यासाठी स्वयंसेविका समाजातील इतर कोणताही नागरिक यांना उत्तेजनार्थ रु २५० शासनाकडून अदा करण्यात येतात

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासकीय रुग्णालयांमधील हंगामी चतुर्थश्रेणी बदली कामगारांना शासन सेवेत कायम करण्याबाबत

**(६४) * ४७८६३ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये १५ ते २० वर्षापासून सुमारे ७३४ बदली कामगार काम करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बदली कामगारांकडे उदरनिर्वाहाचे दुसरे कुठलेही साधन नसल्याने राज्याच्या मुख्य सचिवांसमवेत दिनांक २८ जानेवारी रोजी झालेल्या बैठकीत ज्यांची १० वर्षे पूर्ण आणि प्रतिवर्षी २४० दिवस पूर्ण झाले आहेत अशा कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायम करण्याचे निश्चित करण्यात आले असून याबाबत आदेश देखील काढण्यात आले मात्र या आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायम करण्याच्या मागणीकरीता सदर कर्मचाऱ्यांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासकीय रुग्णालयामधील हंगामी चतुर्थश्रेणी बदली कामगारांना शासन सेवेत कायम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) संचालनालयाच्या प्रस्तावाप्रमाणे ६९५ बदली कर्मचारी आहेत.

(२) मा.मुख्यसचिव यांच्या अध्यक्षतेखाली चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत दिनांक २८/०१/२०१९ रोजी झालेल्या बैठकीत "ज्या कर्मचाऱ्यांना अद्याप सेवेत सामावून घेण्यात आलेले नाही, अशापैकी ज्यांची सेवा १० वर्षे झालेली आहे व प्रतिवर्षी २४० दिवस काम केलेले आहे. अशा कर्मचाऱ्यांची यादी दिनांक १०/०२/२०१९ पर्यंत विभागाला पाठवावी". असे निर्देश मा.मुख्यसचिव यांनी दिले आहेत.

(३) होय.

(४) दिनांक २३/०७/२०१५ च्या शासन निर्णयान्वये संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीकडून ज्या बदली कर्मचाऱ्यांची सेवा १० वर्ष व प्रतिवर्षी २४० दिवस काम केले आहे, अशा कर्मचाऱ्यांची पात्रता तपासण्याचे निर्देश संचालनालयास दिनांक १५/०२/२०१९ रोजी दिले आहेत. पात्रता तपासल्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-नागपूर समृध्दी महामार्गाबाबत

**(६५) * ४६५६३ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गाच्या ७०० कि.मी. लांबीच्या प्रकल्पाचा खर्च रुपये ५५ हजार कोटींवर गेला असून प्रकल्पाला लागणाऱ्या सुमारे ९९०० हेक्टर जमिनीपैंकी १३ टक्के जमिनीचे भूसंपादन शिल्लक असून जमीन देण्यास जमीन मालकांनी विरोध दर्शविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामार्गासाठी बँकांनी जास्त व्याजदराने म्हणजेच ९.५ टक्के व्याज दराने व कमी प्रमाणात कर्ज दिल्यामुळे आर्थिक भार वाढत आहे व यासाठी मुंबई-पुणे महामार्गालगतची राज्य रस्ते विकास महामंडळाची एक हजार हेक्टर जमीन व वांद्रे येथील कार्यालयाची मालमत्ता गहाण ठेवण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्ते विकास महामंडळाने स्वस्त आणि आणखी कर्जासाठी “एशियन डेव्हल्पमेंट ॲण्ड इन्व्हेस्टमेंट बँकेकडे” संपर्क साधला असून स्वस्त व पुरेसे कर्ज न मिळाल्यास प्रकल्प खर्चाचा भार राज्य शासनावर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे व प्रकल्प खर्चाचा भार राज्य शासनावर पडू नये, महामंडळाच्या जमिनी/मालमत्ता अबाधित राहाव्यात, प्रकल्प बाधितांचे नुकसान होऊ नये आणि प्रकल्पाचे काम सुरळीतपणे पार पडावे यासाठी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

नागपूर मुंबई समृध्दी महामार्ग ७०१ कि.मी. चा असून, प्रकल्पाचा खर्च रुपये ५५,३३५.३२ कोटी इतका असून, महामार्गासाठी लागणारी जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने संपादीत करण्यात आली आहे. प्रकल्पास जमीन देण्यास जमीन मालकांनी विरोध दर्शविलेला नाही.

(२) हे खरे नाही. तथापि, व्यापारी व वाणिज्यिक वापराकरीता इक्वीटी योगदानाचा भाग म्हणून मुंबई पुणे महामार्गालगतच्या जमिनीतून तसेच वांद्रे येथील कार्यालयाच्या जागेतून प्राप्त होणारे उत्पन्न समृध्दी महामार्ग प्रकल्पासाठी वापरण्यात येणार आहेत.

(३) सदरहू महामार्गासाठी आवश्यक असणाऱ्या निधीसाठी वित्त संस्था व बँका यांच्यामार्फत कर्ज उभारण्यासाठी वाटाघाटी सुरु आहेत.

(४) हे खरे नाही.

नागपूर मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्ग (महाराष्ट्र समृध्दी महामार्ग) प्रकल्पाचे काम विहित कालावधीत पूर्ण करणे तसेच विलंब व व्याज रकमेतील वाढ टाळण्याकरीता अप्पर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली त्रयस्थ यंत्रणेची स्थापना दिनांक ०३ जून, २०१९ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात आयुष्यमान भारत योजना राबविण्याबाबत

**(६६) * ४७००८ ॲड.अनिल परब, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.रविंद्र फाटक, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या महत्वांकाक्षी आयुष्यमान भारत योजना राज्यात दिनांक २३ सप्टेंबर, २०१८ पासून सुरु झाली असून सदर योजना शासनाच्या रुग्णालयामध्येच लागू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत खासगी रुग्णालये आणि विमा कंपनीशी केलेले करार माहे डिसेंबर, २०१८ मध्ये संपुष्टात आल्याने नव्याने करार करतांना आयुष्मान आणि राज्याची जन आरोग्य योजना एकत्रिकरण करुन आयुष्मान भारत योजनेतील महत्वाच्या ३०० उपचार पध्दतीचा समावेश राज्याच्या जन आरोग्य योजनेत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोणत्या उपचार पध्दतीचा समावेश राज्याच्या जन आरोग्य योजनेत करण्यात येणार आहे व यासंदर्भात निर्णय घेतला आहे काय तसेच आयुष्यमान भारत योजना ही योजना राज्यात कार्यान्वित करतांना योजनेतील जाचक अटीमुळे लाभार्थीना या योजनेचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

शासन निर्णय दिनांक २१ सप्टेंबर, २०१८ नुसार आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेसह दिनांक २३ सप्टेंबर, २०१८ पासून एकत्रितरित्या सुरु झाली असून सुरुवातीला शासनाच्या ८३ शासकीय रुग्णालयात चालू होती. सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय, दिनांक ०५ मार्च, २०१९ पासून शासकीय व अंगीकृत खाजगी रुग्णालयामध्ये राबविण्यात येत आहे.
(२) शासन निर्णय, दिनांक २६/०२/२०१९ नुसार महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेतील लाभार्थी कुटुंबास (जे प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे लाभार्थी नसतील) ९९६ वैद्यकीय उपचारांचा व १२१ पाठपुरावा सेवांचा लाभ मिळेल व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतील लाभार्थी कुटुंबास वरीलप्रमाणे ९९६ वैद्यकीय उपचार व अतिरिक्त २१३ वैद्यकीय उपचार अशा एकूण १२०९ वैद्यकीय उपचारांचा तसेच १८३ पाठपुरावा सेवांचा (महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेतील १२१ पाठपुरावा सेवा व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतील ६२ पाठपुरावा सेवा) लाभ मिळेल. याबाबत निविदा प्रक्रियेची कार्यवाही चालू आहे.

सद्य:स्थितीत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतुन १३०० उपचार पध्दतींचा व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेतून ९७१ उपचारांचा लाभार्थ्यांना लाभ मिळत आहे.

(३) शासन निर्णय दिनांक २६/०२/२०१९ मध्ये नवीन उपचारांचा समावेश असून त्यात सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया व मानसिक उपचार पध्दतींचा समावेश करण्यात आला आहे.

प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ घेण्यासाठी संगणीकृत ई-कार्डस व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ घेण्यासाठी पिवळी, अत्योंदय, अन्नपुर्णा, केशरी शिधापत्रिकाधारक (ज्यांचे उत्पन्न १ लाख रुपयेपर्यंत असलेली) आणि शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यातील शुभ्र शिधापत्रिकाधारक अशा वैध शिधापत्रिका तसेच फोटो ओळखपत्राच्या सहाय्याने लाभ देण्यात येतो. ही प्रक्रिया अत्यंत सुलभ असून लाभार्थ्यांना अंगीकृत रुग्णालयात योजनेचा लाभ घेता येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नरखेड व काटोल (जि.नागपूर) तालुक्यातील फळबाग उत्पादकांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(६७) * ४८७४३ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरखेड व काटोल (जि.नागपूर) तालुक्यांना दुष्काळी नुकसान भरपाई लाभापासून वगळण्यात आल्याने तालुक्यातील संत्रा व मोसंबी उत्पादक नुकसान भरपाई पासून वंचित राहिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेती पिकांचे ३३ टक्के पेक्षा जास्त नुकसान झाले असल्यास रुपये ६ हजार ८०० हेक्टरी दोन हेक्टर पर्यंत व बहुवार्षिक पिकांचे ३३ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त नुकसान झाले असल्यास प्रति हेक्टर रुपये १८ हजार दोन हेक्टर पर्यंत नुकसान भरपाई दोन हप्त्यात देण्याचे जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर जिल्हयासाठी बहुवार्षिक पिकांच्या नुकसान भरपाईसाठी निधीची तरतूद करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर जिल्हयात दुष्काळग्रस्तांना मदत देण्यासाठी निधीची तरतूद करुन नरखेड व काटोल तालुक्यातील संत्रा व मोसंबी उत्पादकांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री.सुभाष देशमुख :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

नागपूर जिल्हयातील दुष्काळ घोषित काटोल, नरखेड व कळमेश्वर या तालुक्यातील शेतीपिकांच्या ३३ टक्यापेक्षा जास्त नुकसान झालेल्या एकूण ८३,९३६,२६ हेक्टर आर क्षेत्रावरील बाधित शेतकऱ्यांसाठी महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक २५/०१/२०१९ अन्वये तीन हप्त्यात मिळून रूपये ५६,९३,५८,४८०/- (अक्षरी रूपये छपन्न कोटी, त्र्यानव लाख, अठ्ठावन हजार, चारशे ऐंशी) निधी वितरीत करण्यात आला होता. प्राप्त निधीपैकी दोन हेक्टरच्या मर्यादेपर्यंत बाधित शेतकऱ्यांना प्रती हेक्टरी ६,८०० रूपये प्रमाणे ५४,७०,०६,४५५/- इतका निधी प्रत्यक्ष ८०,४३१ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करून उर्वरित निधी शासनाकडे समर्पित करण्यात आला आहे.
(३), (४) व (५) नागपूर जिल्हयातील काटोल व नरखेड या तालुक्यातील बहुवार्षिक पिकांच्या ३३ टक्क्यापेक्षा जास्त नुकसान झालेल्या १७९११ शेतकऱ्यांना अनुदान देण्याकरीता जिल्हाधिकारी नागपूर यांच्याकडून एकूण रूपये २६,९६,९४,०००/- (अक्षरी रूपये सव्वीस कोटी शहाण्णव लाख, चौऱ्याण्णव हजार) निधीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

-----------------

## परभणी येथील बाहय वळणाच्या भूसंपादनाचा मावेजा देण्याबाबत

**(६८) * ४६९६७ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील बाह्य वळणाच्या भूसंपादनासाठी रुपये ६५ कोटींचा मावेजा मागणीसाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण कार्यकारी अभियंता यांनी मा.केंद्रीय वाहतूक मंत्री, नवी दिल्ली यांच्याकडे सन २०१८ मध्ये वा त्यादरम्यान अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.केंद्रीय मंत्री महोदयांनी स्थायी अर्थ समितीला सूचना देऊन सदरील निधी वर्ग करण्याबाबतचे आदेश दिले आहेत काय, सदर निधी प्रत्यक्षात प्राप्त झाला आहे काय, निधी प्राप्त करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, किती मुदतीत सर्व प्रक्रिया पूर्ण करुन प्रत्यक्षात बाह्य वळणाच्या कामास सुरुवात करण्यात येणार आहे, याबाबतची सविस्तर माहिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्रस्तुत प्रकरणी मावेजा मागणीचा प्रस्ताव सन २०१८ मध्ये मा.केंद्रीय वाहतूक मंत्री, नवी दिल्ली यांच्याकडे सादर झालेला नसून केंद्र शासनाच्या रस्ते, वाहतूक व महामार्ग विभाग, नवी मुंबई यांच्याकडे सादर करण्यात आला होता.

तथापि, त्यांचेकडून सदर प्रस्तावाबाबत काही मुद्दे उपस्थित करण्यात आल्याने सद्य:स्थितीत उपस्थित मुद्दयांची पूर्तता करुन सुमारे रुपये ६१.९६ कोटी किंमतीचा प्रस्ताव दिनांक ०४/०६/२०१९ रोजी पुन:श्च केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग विभाग, नवी मुंबई यांचेकडे फेरसादर करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

परभणी बाहयवळण रस्त्याचे भूसंपादन व बांधकामाचे काम केंद्र शासनाच्या सन २०१९-२० च्या वार्षिक नियोजनामध्ये प्रस्तावित करण्यात आले आहे.

(३) प्रस्तुत काम केंद्र शासनाच्या वार्षिक नियोजनामध्ये मंजूर झाल्यानंतर निधीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करुन प्रत्यक्षात सुरु करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औषधी वनस्पती लागवडीच्या अनुदानाचे वाटप शेतकऱ्यांना करण्याबाबत

**(६९) * ४६५४१ श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिकेत तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या आयुष मंत्रालयाकडून राज्यात विविध प्रकारच्या ६० औषधी वनस्पती लागवडीकरीता सन २०१७-१८ या वर्षात रुपये २.६५ कोटींचे अनुदान मंजूर करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत औषधी वनस्पती लागवडीचे अनुदान शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अनुदानाबाबत राज्याचा कृषी विभाग व आरोग्य विभाग एकमेकांवर जबाबदारी ढकलत असल्यामुळे राज्याच्या कृषी मंत्र्यांनी चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश संबंधित विभागाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरचा अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे काय, अहवालातील निष्कर्ष काय आहेत, याबाबत कोणावर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे, त्यानुसार शासनाने चौकशी करुन संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल बोंडे :** (१) नाही.

"राष्ट्रीय आयुष अभियान" या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत सन २०१७-१८ करीता Medical Plants या घटकांतर्गत एकूण रुपये ३५५.००८ लाख इतके केंद्रीय अनुदान मंजूर केले आहे.

(२) होय.

तथापि, सन २०१७-१८ करीता मंजूर अनुदान सन २०१८-१९ मधील प्रस्तावित उपक्रमाकरीता वित्तीय मर्यादेत वितरीत करण्याची विनंती करण्यात आली होती. त्यास केंद्र शासनाने रुपये २१४.६९ लाख इतक्या वित्तीय मर्यादेत खर्च करण्यास सहमती दर्शविली असून सदरहू अनुदान PFMS प्रणालीद्वारे व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे यांना वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय.

सन, २०१७-१८ करीता संचालक, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे यांनी राष्ट्रीय आयुष अभियान औषधी वनस्पती घटक या केंद्र/राज्य पुरस्कृत (६०:४० हिस्सा) योजनेचा वार्षिक आराखडा संचालक, आयुष संचालनालय, मुंबई यांना सादर केला होता. राज्य आयुष सोसायटी, मुंबई यांना निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती करुनही सन २०१७-१८ चा निधी संचालक, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे या कार्यालयास उपलब्ध करुन दिला नसल्याने कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे शक्य झालेले नाही. यासंदर्भात राज्य आयुष सोसायटी, मुंबई यांचेकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) तालुक्यातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(७०) * ४७६८१ श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) तालुक्यातील गव्हाणफाटा चिरनेर व दास्तान फाटा-दिघोडे या १० कि.मी. रस्त्याच्या दुरुस्तीसाठी मागील दीड वर्षात दीड

कोटींहून अधिक निधी खर्च झालेला असूनही रस्त्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामांमुळे सदर रस्त्यावर खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अपघात होऊन जिवितहानी होत आहे, रस्त्याच्या दुरुस्तीबाबत स्थानिक नागरिकांनी मागणी केल्यानंतर मा.केंद्रीय वाहतूक मंत्री यांनी गव्हाणपाडा-चिरनेर मार्गे रसायनी परिसर रस्त्याच्या नव्याने डांबरीकरण काँक्रीटीकरणाच्या कामासाठी रुपये १७५ कोटीचा निधी मंजूर केला असून सदरहू रस्त्याच्या कामास सुरुवातही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

सदर रस्त्याच्या दुरुस्तीकरीता, रस्ते देखभाल दुरुस्ती अंतर्गत मार्च, २०१८ मध्ये खड्डे भरण्याचे काम पूर्ण करुन रस्ता वाहतुकीस योग्य करण्यात आला होता. त्यानंतर पावसाळयामध्ये रस्त्यावर नव्याने पडलेले खड्डे संबंधित कंत्राटदारामार्फत भरुन रस्ता सुस्थितीत करण्यात आला होता.

(२) हे खरे नाही.

सदर रस्ता कायमस्वरुपी सुस्थितीत ठेवण्यासाठी शासनाच्या हायब्रिड ॲन्युईटी योजनेंतर्गत गव्हाणफाटा चिरनेर साई खारपाडा या रस्त्याचे काम सन २०१७-१८ मध्ये मंजूर केलेले आहे. सदर रस्त्याच्या कामाला दिनांक १ जानेवारी, २०१९ पासून सुरुवात झाली असून आतापर्यंत गव्हाणफाटा ते दिघोडा या ६.३० कि.मी. लांबीमधील १.५ कि.मी. कॉक्रीट रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरीत २ कि.मी. मधील कॉक्रीट रस्त्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच दास्तानफाटा-दिघोडे ते रानसई या ६.९० कि.मी. लांबीकरीता हायब्रिड ॲन्युईटी योजनेंतर्गत सुधारणा करण्याचे नियोजन आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उनखेड (ता.मूर्तिजापूर, जि.अकोला) येथील प्रकल्पग्रस्तांच्या मागण्याबाबत

**(७१) * ४७२२५ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उनखेड (ता.मूर्तिजापूर, जि.अकोला) येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना सन २०१३ च्या सुधारित भूसंपादन कायद्यानुसार वाढीव मोबदला देणे, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना प्रमाणपत्र व रुपये ५ लाख देणे, उनखेड येथील पूर संरक्षण भिंतीचे बांधकाम सुरु करुन उमा नदीच्या खोलीकरणाचे व रुंदीकरणाचे अपूर्ण काम पूर्ण करुन देणे, जामठी रस्त्यावरील नदी पात्रात पाच फूट उंच सिमेंट रस्ता बांधून देणे, तसेच उनखेडमधील गट क्रमांक १५९ पासून ते सांडव्यापर्यंत धरणाच्या खालच्या बाजूस पावसाळ्याचे पाण्याचा निचरा होण्यासाठी भिंतीलगत चारी खोदून देणे इत्यादी मागण्याकरीता माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान प्रकल्पग्रस्तांनी साखळी उपोषण केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या मान्य करुन त्याची अंमलबजावणी करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) सरळ खरेदीने भुधारकांनी जमीन हस्तांतरीत केली असल्याने त्यांना नियमानुसार मोबदला अदा करण्यात आला आहे. मौजे उनखेड येथील पुर संरक्षक भिंतीचे काम दिनांक ३/३/२०१९ पासून सुरु करण्यात आले आहे. उमा नदी रुंदीकरणाचे काम दिनांक २९/०३/२०१९ पासून सुरु करण्यात आले असून सद्य:स्थितीत काम प्रगतीपथावर आहे. धरणाच्या कामासोबत टो ड्रोन चे काम सुरु करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धाणेगाव (ता.केज, जि.बीड) येथील मांजरा धरणाशेजारी मत्स्यबीज उत्पादन केंद्र सुरु करण्याबाबत

**(७२) * ४७८९४ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाणेगाव (ता.केज, जि.बीड) येथील मांजरा धरणाशेजारी मत्स्यबीज उत्पादन केंद्र लाखो रुपये खर्च करुन स्थापन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू केंद्रात मत्स्यबीज उत्पादन वाढविणे व परिसरातील साठवण तलाव तळी माध्यमातुन मत्स्यशेती व्यवसाय वाढीस लागावा व शासकीय उत्पादनात वाढ व्हावी याकरीता या केंद्राची स्थापना करण्यात आलेली होती तसेच या ठिकाणी वर्ग ४ च्या ३ कर्मचाऱ्यांची शासनाने नियुक्ती केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मत्स्यबीज उत्पादन केंद्र ९ वर्षापासून शासनाच्या दुर्लक्षामुळे बंद होण्याच्या स्थितीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरील मत्स्यबीज उत्पादन केंद्र पूर्ववत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) होय.

(२) होय.

(३) जिल्हयातील अवर्षणामुळे मत्स्यबीज उत्पादन केंद्रासाठी आवश्यक पाणीपुरवठ्या अभावी मत्स्यबीज उत्पादन घेता आलेले नाही.

(४) केंद्र भाडेपट्टीने चालविण्यासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यात नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित नुकसानग्रस्तांना मदत देण्याबाबत

**(७३) * ४७२५६ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्धापूर, तामसी, पेठवडज, हदगाव (जि.नांदेड) परिसरात वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे शेतकऱ्यांचे हळद, ज्वारी, केळी इ. विविध पिकांचे नुकसान झाल्याचे दिनांक १८ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देशमुख :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय.

दिनांक २३ एप्रिल, २०१९ च्या शासन पत्रान्वये क्षेत्रिय कार्यालयांना अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करुन अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मिरकरवाडा (जि.रत्नागिरी) प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(७४) * ४७८१८ ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक ४४२८४ ला दिनांक २६ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरकरवाडा (जि.रत्नागिरी) प्रकल्पाच्या टप्पा २ येथील मत्स्यबंदर विकास प्रकल्प कामास शासन निर्णय दिनांक २४ जुलै, २०१३ अन्वये रुपये ७४ कोटी ६९ लक्ष ६७ हजार अंदाजित किंमतीस प्रशासकीय मान्यता दिली असून सन २०१८-१९ या वर्षाकरीता एकूण रुपये ३७.८७० कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली असताना येथे सुरु झालेले काम सद्य:स्थितीत बंद असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र व राज्य शासनाच्या अर्थसंकल्पात निधीची तरतुद करण्यात आली असली तरी प्रत्यक्ष निधी उपलब्ध न झाल्याने कामाला सुरुवात झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मिरकरवाडा बंदराच्या टप्पा २ चे काम विनाविलंब हाती घेवून पूर्ण करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, सदरहू काम किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) होय.
(२) व (३) हे खरे नाही.

मिरकरवाडा येथील काम महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचे मार्फत ब्रेक वॉटर व ड्रेजिंगची कामे पूर्ण करण्यात आली आहे. ब्रेकवॉटरच्या काटछेदामध्ये बदल झाल्याने महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांनी ब्रेकवॉटर व ड्रेजींगच्या कामावर वाढीव खर्च केला असून हे काम पूर्ण करण्यासाठी प्रशासकीय मान्यता रक्कमेपेक्षा जास्त निधी आवश्यक असल्याने केंद्र शासनाच्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेस्तव प्रस्ताव दिनांक १५/०५/२०१९ रोजीच्या पत्रान्वये सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.